## बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३१ | बुधवार, दि.१० जुलै २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# शहरात महिला पुरुषांसाठी नाही सार्वजनिक शौचालय, कामानिमित्त येणाऱ्या लाडक्या बहिणींची कुचंबना





**गोंदिया:** मोठी बाजारपेठ असलेल्या गोंदिया शहरातील मुख्य चौकात महिलांसाठी सार्वजनिक शौचालय आणि मुतारीची व्यवस्था नाही. त्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या महिलांची मोठी कुचंबना होत आहे. तथापि,लोकप्रतिनिधी व नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दखल घेऊन आम्हाला न्याय द्यावा,अशी मागणी महिलांनी केली आहे.

गोंदिया शहर म्हटले की राष्ट्रीय नेत्यांचा शहर अशी ओळख. त्यातच सध्या राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा गवगवा मोठ्या उत्साहाने सर्वच राजकीय पक्षाचे आजी-माजी लोकप्रतिनिधी होर्डिंगच्या माध्यमातून करू लागले आहेत.मात्र, या नेत्यांना आपल्या शहरातील शासकीय कार्यालयाशेजारील चौक असो की, बाजारपेठेतील गर्दीचे ठिकाण असो, त्या ठिकाणी महिलांसाठी शौचालय व मुतारीची व्यवस्था करायची आठवण आली नाही. परिणामी,या लोकप्रतिनिधींच्या निर्लज्जपणाचा कळस म्हणावा की काय गाव खेड्यासह शहरातील अनेक महिला-बहिणींसह भावांना उघड्यावर शौचालयसह लघुशंका करण्याची वेळ आली आहे.

संविधानाच्या प्रास्ताविकेप्रमाणे दर्जाची व संधीची समानता आहे. तसेच संविधान कलम १४ नुसार सर्वजण कायद्यापुढे समान असल्याचं म्हणत या महिलांनी शहरात शौचालय व मुतारीची मागणी केलीय. अशी व्यवस्था नसल्यामुळे संविधानाचं उल्लंघन होत असल्याचा आरोपही या महिलांनी केलाय. महिला म्हणाल्या, शहरांमध्ये महिलांसाठी शौचालय व मुतारी नसणे हे संविधानाचे उल्लंघन असून गंभीर बाब आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी अजून महिलांसाठी मूलभूत हक्क मिळाले नाहीत. याची दखल लोकसेवक मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी घ्यावी आणि आम्हाला न्याय द्यावा. निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी,महिला न्यायाधिश,महिला वकिल या सुद्धा या रस्त्यावरुन अनेकदा ये-जा करतात त्यामुळे त्याना तरी महिलांच्या समस्या कळत नसतील काय अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे.

गोंदिया ही मोठी बाजारपेठ आहे. अनेक खेडे गावामधील महिला सुद्धा येतात, परंतु या समस्यांना त्यांना नेहमी सामोरे जावे लागते. याची शहनिशा करण्यासाठी शहरामध्ये महिलाच्या समस्या स्वतः जाणून घेतल्या तर या अधिकाऱ्यांनाही नक्की समजून येईल,त्याकरीता मात्र प्रबळ ईच्छाशक्ती या महिला अधिकाऱ्यांमध्ये निर्माण होणेही तेवढेच गरजेचं आहे.

गेल्या अनेक वर्षापासून जयस्तंभ चौक, नेहरु चौक, मुख्य भाजी बाजार, स्टेडियम परिसर, गोरेलाल चौक आदि परिसरात महिलांकरिता शौचालय व मुतारीची व्यवस्था करण्यात यावी याकरिता नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यासह उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदने सादर झाली. मात्र या अधिकाऱ्यांना यांच्या घरातील कुणावर त्या ठिकाणी उघड्यावर लघुशंका किंवा शौचालयाची वेळ आली नाही, म्हणूनच की काय यांनी त्या निवेदनांना कचऱ्याच्या पेटीत टाकले.

तर लोकप्रतिनिधींनाही आया-बहिणी या फक्त मतदानापुरत्या लाडक्या नंतर मात्र त्यांच्या करिता काहीच किंमत नसल्याने त्यांच्या या उघड्यावरील लघुशंका व शौचालयाच्या प्रसंगाकडे दुर्लक्ष करतात.

शहरातील मुख्य चौक असलेल्या जयस्तंभ चौकात न्यायालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय असलेल्या प्रशासकीय इमारतीत ४० च्यावर विविध विभागाचे कार्यालय आहेत.

शेजारीच वाहतूक पोलिस, पंचायत समिती कार्यालय व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय आहे. या सर्व कार्यालयात गाव खेड्यातून मोठ्या प्रमाणात महिला-पुरुष येतात. त्यातच या परिसरातच शाळा-महाविद्यालय असल्याने विद्यार्थिनींची संख्या खूप मोठी आहे.

या चौकात जेव्हा या सर्व महिला-पुरुष विद्यार्थिनी बस किंवा खासगी वाहनाची वाट बघत असतात अशावेळी त्यांना लघुशंका व शौचलय लागले तर जावे कुठे? असा प्रश्न अनेकदा नव्हे तर दररोज उपस्थित होतो. नाईलाजाने शौचालय व मुतारीची सोय नसल्याने न्यायलय व प्रशासकीय इमारतीच्या मध्य असलेल्या रस्त्याच्या कडेलाच दिवसाढवळ्या पुरुष लघुशंका करीत असतात. त्याचवेळी त्या रस्त्याने जाणाऱ्या आया-बहिणींना मात्र खाली मान करुन शरमेने जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. तरीही मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या गवगवा करणाऱ्या व त्यांचे अर्ज भरण्याकरिता कार्यालय उघडणाऱ्या त्या नेत्यांनी आधी या समस्येचे निराकरण करावे. नंतरच लाडक्या बहिण योजनेचा उदोउदो करावा असा सूर जनतेतून उमटू लागला आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि चिन्हाला निवडणूक आयोगाने दिली मान्यता

**नवी दिल्ली:-** राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आणि चिन्हाला अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे कलम २९ बी नुसार राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आता देणगी स्विकारता येणार नाहे. त्यामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा मोठा दिलासा मिळाला आहे.






**शरद पवार गटाला मोठा दिलासा**

राज्यात काही महिन्यांवर विधानसभा निवडणुका आल्या आहेत. त्यासाठी पक्षाला निधी उभारण्यासाठी शरद पवार गटाच्या वतीने काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाकडे लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत एक वेगळा राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती केली होती. त्याची सुनावणी आज सोमवारी झाली. त्यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. आता या पक्षाला कलम २९ इ नुसार देणगी स्वीकारता येणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्षाला मोठा दिलासा मिळाल्याचे बोलले जात आहे. ६ फेब्रुवारी रोजी निवडणूक आयोगाने विधिमंडळातील संख्याबळानुसार मूळ राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष चिन्ह अजित पवार गटाला दिले होते. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे.

त्यानंतर १९ मार्चच्या अंतरिम आदेशात, सुप्रीम कोर्टाने आयोगाला शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाला मान्यता देण्याचे आदेश दिला होता. निवडणूक आयोगातील सुनावणीनंतर शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. आज आमच्या चार वेगवेगळ्या महत्त्वाच्या सुनावण्या दिल्लीत होत्या. शरद पवार यांचा पक्ष ज्याप्रकारे काढून घेण्यात आला, पण जनतेने आम्हाला आशीर्वाद दिले त्याबद्दल आभार. आम्हाला तुतारी हे चिन्ह तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आलं होतं. पण आम्हाला चेक घेण्याचा अधिकार नव्हता. तसेच टॅक्स बॅनेफिट मिळत नव्हता. तर आता आमची विनंती मान्य करण्यात आली आहे, अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.

# शिक्षक संख्येचा अन्याय दूर करणार का?

## १८ शाळा शिक्षकांपासून वंचित, पालकांची जिल्हा परिषद प्रशासनाकडे आर्त हाक

**देवरी:** आधीच मागास म्हणून गणला जाणारा देवरी तालुका प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे पिछाडीवर लोटण्याचा प्रकार होत आहे. एकूण ९० शिक्षकांची आवश्यकता असताना, पुन्हा बदली-पदोन्नती कार्यक्रम राबवित तब्बल १८ शाळांना शिक्षकांपासून वंचित करण्यात आले. परिणामी पालकांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये आपल्या पाल्यांना पाठवावे की नाही? असा प्रश्न पडला आहे. जिल्हा परिषद प्रशासन हा अन्याय आता तरी दूर करणार का? असा प्रश्न देवरी तालुकावासीयांनी प्रशासनाला केला आहे.




उल्लेखनीय म्हणजे सध्या शाळा नुकत्याच सुरु झाल्या असून एकीकडे शाळाप्रवेशाचा गाजावाजा केला जात आहे. तर दुसरीकडे मात्र शिक्षक संख्येत कपात केली जात आहे. देवरी पंचायत समिती अंतर्गत एकूण १३८ शाळा कार्यरत आहेत. यामध्ये वरिष्ठ प्राथमिक शाळांची संख्या ही ४१, तर प्राथमिक शाळांची संख्या ९७ एवढी आहे. गेल्या अनेक दिवसांपासून देवरी पंचायत समितीमध्ये शिक्षकसंख्येत प्रचंड तफावत प्रशासनाच्या लालफितशाही आणि राजकीय हस्तक्षेपामुळे केली जात असल्याचा आरोप नेहमीच होत आला आहे.

देवरी तालुका हा राजकीयदृष्ट्या आणि आर्थिक-शैक्षणिकदृष्ट्या मागास म्हणून गणला जातो. अशा परिस्थितीत या भागातील गरीब आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासंबंधी गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. या पंचायत समितीमध्ये बदली व पदोन्नतीच्या नावावर बाहेर जाणाऱ्या शिक्षकांची त्यांच्या मर्जीप्रमाणे बदली करण्यात येते. मात्र हा तालुका अतिदुर्गण म्हणून हिणवत या पंचायत समितीमध्ये पदस्थापना घेण्यात शिक्षक कर्मचारी काहीही करुन टाळत असल्याचे चित्र नेहमीच बघावयास मिळते. आधीच शिक्षक संख्या कमी असताना सुमारे ६० च्या आसपास शिक्षकांना त्यांच्या विनंतीवरुन इतरत्र स्थानांतरित करण्यात आले. जवळपास तालुक्यातील एक शिक्षकी शाळांची संख्या प्रचंड आहे. आणखी त्यात भर पडल्याने शाळा चालवायच्या कशा? असा प्रश्न स्थानिक स्तरावर निर्माण झाला आहे.

सध्या देवरी तालुक्यामध्ये काही प्राथमिक शाळा आणि एक हायस्कूल याची गुणवत्ता वाढविण्यात स्थानिक प्रशासनाला यश आले आहे. परिणामी, जिल्हा परिषद शाळांपासून दूर जाणारा विद्यार्थी वर्ग आता जि.प.च्या शाळेकडे आकर्षित होण्यास सुरुवात झाली होती. पण प्रशासनाच्या घिसाडघाई धोरणामुळे पुन्हा एकदा जि.प.च्या शाळेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो की काय? अशी शंका निर्माण झाली आहे. हा घोळ निर्माण करुन प्रशासन देवरीकरांना काय संदेश देऊ इच्छित आहे, हे कळायला मार्ग नाही.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर परिणाम

**आधीच शिक्षक संख्या कमी असताना शिक्षकांवर ऑनलाईन माहिती पुरविण्याचा दबाव आणि इतर अशैक्षणिक कामाचा बोजा आहे. यामुळे अध्यापन कार्य प्रभावीत होत आहे. त्यात शिक्षकांची कमतरता भर घालत आहे. अशी परिस्थिती असताना कितीही कार्यकुशल शिक्षक असतील तरी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम कसा कसा थांबविणार?यावर शंका आहे. परिणामी, जि.प. शाळेकडे वळलेले चिमुकल्यांचे पाऊल पुन्हा शहरी भागातील खासगी शाळेतही वळले, तर नवल वाटायला नको. तरी या यावेळेस पुरेसा शिक्षक वर्ग तालुक्याला देत देवरी सारख्या मागास तालुक्यावर प्रशासन उपकार करेल, अशी भाबडी आशा देवरीकरांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे देवरी येथे मरणासन्न अवस्थेत गेलेली जि.प. हायस्कूल जिवंत केल्याच्या प्रयत्नांवर तरी प्रशासन विरजण घालणार नाही, एवढी रास्त अपेक्षा तर केली जाऊच शकते.**

## गोंड गोवारी समाज प्रतिनिधींनी समितीला लेखी निवेदन द्यावे

**गोंदिया,** : गोंड गोवारी समाजाच्या निवेदनांवर अभ्यास करण्यासाठी उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश के.एल.वडणे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभागाचे ६ मार्च २०२४ चे शासन निर्णयानुसार समिती नेमण्यात आलेली आहे. गोंड गोवारी समाजाच्या संबंधित संघटनेचे प्रतिनिधी हे नागपूर महसूल विभाग १५ व १६ जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रविभवन, शासकीय विश्रामगृह नागपूर येथे आणि अमरावती महसूल विभाग १८ व २० जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह अमरावती येथे उपस्थित राहून समितीसमोर आपले संक्षिप्त लेखी निवेदन सादर करु शकतील. निवेदन हे टंकलिखित व वाचनीय असणे आवश्यक आहे. तसेच संघटनेतील प्रतिनिधीला थोडक्यात आपले म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्यात येईल. असे सहआयुक्त तथा अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे उपाध्यक्ष अमिता पिल्लेवार यांनी कळविले आहे.

## राज्य महसूल कर्मचाऱ्यांचा १० जुलैपासून बेमुदत संप

**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्या संदर्भात शासन स्तरावर कोणतीही कारवाई होत नसल्याने पुन्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने आंदोलनाची भूमिका घेण्यात आली आहे. हे आंदोलन १० जुलैपासून करण्याचा इशारा निवेदनाच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.



यापुर्वी झालेल्या आंदोलनात राज्य शासनाने राज्य महूसल कर्मचाऱ्यांना मागण्या पुर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्या आश्वासनाची पुर्तता होत नसल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व महसुली कर्मचारी हे दिनांक १० जुलैपासून टप्प्याटप्प्याने आंदोलन करणार आहेत. १० जुलै रोजी काळ्याफिती लावून काम करणे, ११ रोजी दुपार नंतर कार्यालयावर निदर्शने, १२ जुलै रोजी लेखनीबंद आंदोलन तर १५ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनात सर्व महसूल कर्मचाऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य सहसचिव तसेच गोंदिया जिल्हाध्यक्ष आशिष रामटेके केले आहे. विशेष म्हणजे निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी तसेच राज्य शासनाला पाठविण्यात आली आहे.

# पावसाळी पर्यटनाला जाताय,सर्तकता पाळा!

## २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**गोंदिया :-** पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील भुशी धरण येथे पर्यटनास गेलेल्या पर्यटकांसोबत झालेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होवु नये तसेच अशा दुर्घटना टाळण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी प्रजित नायर यांनी जिल्ह्यातील नवेगावबांध/नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान, इटियाडोह धरण, हाजराफॉल धबधबा, कचारगढ गुहा, पुजारीटोला धरण, कालीसराड धरण, शिरपूर धरण, चोरखमारा तलाव, बोदलकसा तलाव, चुलबंद प्रकल्प, खडबंदा तलाव, कोरणीघाट व इतर लहान, मध्यम तलाव व धरण तसेच वैनगंगा, बाघ, गाढवी, पांगोली, चुलबंद नदीच्या काठावर किंवा घाटांच्या ठिकाणावर सभोवताली २०० मीटर परिसरात ६ जुलै ते ३० सप्टेबर २०२४ या कालावधीत खालील बाबींकरीता मनाई/ प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहे.



पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे. धबधब्या जवळ जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे. पावसामुळे धोके दायक झालेली ठिकाणे, धबधवे, दऱ्यांचे कटडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी सेल्फ्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे. पावसामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक धबधब्याचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनाधिकृत मद्य विक्री करणे व उघडयावर मद्य सेवन करणे. वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतुकीस परिणाम होईल अशा प्रकारे वाहने चालविणे. वाहनांची ने-आण करतांना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे, सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्य उघडयावर इतरत्र फेकणे.

सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगल-टवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे. सार्वजनिक ठिकाणी मोठया आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, डी.जे. सिस्टीम वाजवणे, गाडीमधील स्पीकर/उफर वाजवणे व त्यामुळे ध्वनी प्रदुषण करणे. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदुषण होईल अशी कोणतीही कृती करणे. धबधब्याचे २०० मिटर परिसरात सर्व दुचाकी, चारचाकी व सहाचाकी वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून).

वरील आदेशाचे पालन न करणारी/उल्लंघन करणारी कोणतीही व्यवती, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

# ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंचाला प्रवेशबंदी; ग्रा.पं.कर्मचाऱ्याचा प्रताप

**गोंदिया:-** तिरोडा तालुक्यातील डोंगरगाव येथील ग्राम पंचायत कार्यालयातील पदसिध्द पदाधिकारी तथा संवैधानिक पदावर असलेल्या उपसरपंचाला ग्राम पंचायत कार्यालयात येण्यापासून रोखण्यात आले. सरपंचाच्या आदेशान्वये ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांकडून उपसरपंचाला मज्जाव घातला जात आहे. हा प्रकार तिरोडा तालुक्यातील डोंगरगाव येथे उपसरपंच असलेले शुभम नरेंद्र भैसारे यांना कोणत्या कारणाने ग्राम पंचायत कार्यालयात पायबंद घालण्यात आले, हे स्पष्ट नसले तरी सरपंचाचा मनमानी कारभार मात्र समोर आला आहे.

या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार करण्यात आली असून सरपंचावर अपात्रतेची कारवाई करावी, अशी मागणी भैसारे यांनी केली आहे. तिरोडा तालुक्यातील ग्राम पंचायत डोंगरगाव येथे ग्रा.पं.सदस्य तथा उपसरपंच पदावर शुभम नरेंद्र भैसारे हे विराजमान आहेत. ते अनुसूचित जाती प्रवर्गातून येत असून दिव्यांग आहेत. लोकशाही प्रक्रियेनुसार निवडणुकीच्या माध्यमातून जनतेने त्यांना प्रतिनिधीत्वाची संधी दिली आहे. संवैधानिक व्यवस्थेत पदसिध्द पदाधिकारी असून त्यांना काही अधिकार मिळाले आहेत. परंतु, सरपंच आपल्या मनमानी कारभाराचा परिचय देत त्यांना त्यापासून वंचित ठेवत आहे. भैसारे हे ३ जुलै रोजी ग्राम पंचायत कार्यालयात गेले असता त्यांचा मज्जाव करून त्यांना कार्यालयात प्रवेश देण्यात आले नाही. ग्राम पंचायत कर्मचाऱ्याने त्यांची अडवणूक करून कार्यालयाचे दार बंद करीत त्यांना हाकलण्याचा प्रयत्न केला. यावर भैसारे यांनी विचारणा केली असता अरेरावी करून मला सरपंचाने आदेश दिला आहे, असे सांगितले. त्यामुळे सरपंच कोणत्या कारणाने उपसरपंचावर प्रवेशबंदी लादत आहेत, याची चर्चा सुरू झाली आहे. अशाप्रकारे एका पदसिध्द पदाधिकाऱ्याला त्याच्या अधिकार व कर्तव्यापासून दूर ठेवणे, हे कायद्याचा अपमान आहे.



त्यामुळे त्या सरपंचावर अपात्रतेची कार्यवाही करून पदमुक्त करण्यात यावे तसेच ग्रा.पं.कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पिडीत उपसरपंच शुभम नरेंद्र भैसारे यांनी केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, तहसीलदार व खंडविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणी वरिष्ठ कोणती भुमिका घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### आरोप करून प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न

**सरपंच यांच्याकडून उपसरपंचावर कागदपत्र चोरीचा आरोप लावून प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शासकीय दस्तऐवज पूर्णपणे ग्रामसेवकाकडे सुरक्षित असतात. त्यामुळे ग्रा.प.दस्ताऐवज चोरीला जाण्याचे भागच येत नाही. जर असे झालेही तर त्याची तक्रार ग्रामसेवकाकडून पोलिस ठाण्यात करण्यात येणार. पण सरपंच फ्रक्त आकसापोटी बदनाम करून ग्राम पंचायत कार्यालयापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण माझ्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा, चोरीत सहभागाची तक्रार अथवा नोंद नाही. त्यामुळे कशावरून माझ्यावर आरोप केला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या सगळ्या प्रक्रियेमध्ये मला डावलन्यासाठीच सरपंच आणि चपराशी खटाटोप करीत आहेत, असे भैसारे यांनी व्यक्त केले. उपसरपंच या महत्वाच्या पदावर असूनही मला विचारात न घेता मनमर्जीने कामकाज सुरू आहे. एवढेच नाही तर आयोजित सभेची नोटीस किंवा सुचना मला वेळेवर दिली जाते. सभेत आपले मत मांडायला गेलो तर तू बोलू नको, तु आपले कानून-कायदे आपल्या जवळ ठेव, असे बोलून मानसिक त्रास देत आहेत. प्रत्येक बाबतीत विरोधात्मक भुमिका घेवून माझी पिवळणूक केली जात आहे, असाही आरोप उपसरपंच भैसारे यांनी केला आहे.**

## संपादकीय

# झाडे लावा, जीवन वाचवा

उन्हाळ्यात आपणा सर्वांना ४५ डिग्रीपेक्षा जास्त तापमानाला सामोरे जाण्याची वेळ आली होती. त्यावेळी आपली मानसिक अवस्था काय झाली होती याचा प्रत्येकांनी विचार करावा. याचे एकमेव कारण होते ते म्हणजे औद्योगिकीकरणाच्या नावाखाली झाडांची होणारी कत्तल. त्याचबरोबर नवीन झाडे लावली पाहिजेत. घोषणा होतात, मात्र नंतर त्या घोषणांचे काय होते हे देशातील सर्वसाधारण जनतेला माहिती असते. तेव्हा आता जनतेनेच अशा गोष्टींमध्ये सतर्क राहाणे गरजेचे आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडे महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत असतात याची जनजागृती करावी लागेल. त्यासाठी ङ्गआला पावसाळा, चला झाडे लावूयाफ अशा घोषणांनी लोकांना झाडे लावण्याची जाणीव करून दिली पाहिजे. तेव्हा आपले सर्वांचे जीवन वाचविण्यासाठी चला तर पावसाळा सुरू झाला. सर्वांना संजीवनी मिळण्यासाठी झाडे लावूया तरच आपले जीवन वाचवू शकतो.

हिरव्यागार झाडांमुळे जणू सृष्टीने हिरवा शालू नेसला असे आपणा सर्वांना वाटत असते. तेव्हा कोकणात आल्यावर असे शालू पाहायला मिळतात. त्यामुळे मनाचे खूप समाधान होते. कारण आपण निसर्गाच्या सान्निध्यात आल्याची आपल्याला जाणीव होते. मात्र आजची परिस्थिती वेगळी आहे. विकासाच्या नावाखाली वृक्षतोड होते. त्या प्रमाणात वृक्षारोपण होत नाही. त्यामुळे आज ङ्गझाडे लावा, जीवन वाचवाफ असे म्हणण्याची वेळ आली आहे. तसेच ङ्गमन की बातफया कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुद्धा देशातील जनतेला आवाहन केले की, आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे याची पण सर्वांना माहिती आहे.

देशात विकासाच्या नावाखाली झाडे तोडली जातात. मात्र त्या प्रमाणात झाडांची लागवड केली जात नाही. तेव्हा निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावण्यासाठी जनजागृती करून झाडे लावली पाहिजेत. त्याचप्रमाणे झाडांचे संगोपन केले पाहिजे तरच आपले जीवन वाचवू शकतो. तेव्हा आजच्या घडीला झाडे लावणे गरजेचे झाले आहे. एक वेळ आपल्या परिसरातील डोंगर झाडांच्या हिरव्यागार पानांनी सजलेले दिसत होते. आज त्या ठिकाणी सिमेंटची जंगले उभी असताना दिसतात. याचा परिणाम दिवसेंदिवस जंगलतोड होत असल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. तेव्हा सुजाण नागरिकांनी उंच इमारतीत राहाणे पसंत जरी केले तरी किमान एक व्यक्ती एक झाड दर वर्षी लावणे स्वत:च्या तसेच देशाच्या हितासाठी गरजेचे आहे. म्हणजे दर वर्षी देशात १०० कोटीपेक्षा जास्त झाडे लावू शकतो. हा महत्त्वाचा संकल्प सन २०२४ पासून आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांनी केला पाहिजे. केवळ ङ्गझाडे लावा झाडे जगवाफ अशी घोषणा करून चालणार नाही तर प्रत्यक्षपणे कृती करणे गरजेचे आहे. जेव्हा शासकीय अनुदानातून वृक्षारोपण करीत असतो तेव्हा अनुदान फ्फुकट जाणार नाही याची काळजी वनविभागाला घ्यावी लागेल. त्यासाठी प्रथम जमिनीचे क्षेत्र निवडावे लागेल. उन्हाळ्यात दोन ते तीन वर्षे झाडांना पाणी घालण्यासाठी जवळपास नदी-नाले असणे आवश्यक आहे. वाडीत व गावातील मोकळ्या जागेत तसेच रस्त्यांच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करण्यात यावी तसे अगोदर मोकळ्या जागेचे सर्वेक्षण शासनाच्या वतीने करण्यात यावे. म्हणजे पावसाळ्यात झाडे लावणे सोयीचे होईल.

सध्या पावसाळा सुरू झाला असला तरी कडक उन्हाळ्यामध्ये प्रत्येकाला झाडांची आठवण आली असेल. तेव्हा गाजावाजा न करता किमान ङ्गएक व्यक्ती, एक झाडफया तत्त्वाचा अवलंब करून या वर्षीपासून झाडे लावूया. त्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्तीने डोळ्यांसमोर ध्येय्य ठेवूया. यातच आपले सर्वांचे कल्याण आहे. दरवर्षी झाडे लावा, झाडे जगवाचा नारा देतो. मात्र यातील किती झाडे जगवतो याचा प्रामाणिकपणे विचार होणे आवश्यक आहे. पाहा ना देवेंद्र फ्फडणवीस सरकारच्या काळात राज्यात ३३ कोटी झाडे लावण्याचा निर्धार केला होता. त्यासाठी रुपये एक हजार कोटी खर्च करण्यात आले. याची सुरुवात १ जुलै, २०१९ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील आनंदवनमध्ये वनमहोत्सव साजरा करून १ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या तीन महिन्यांत झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यावेळी ङ्गएकच लक्ष, लावू ३३ कोटी वृक्षफ अशा गर्जना सुद्धा झाल्या. आता यातील किती झाडे जगली आहेत याचा वनमहोत्सव साजरा करणा?्या वनविभागाने घोषित करणे आवश्यक आहे. कारण ही झाडे लावण्यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकाचा आर्थिक सहभाग आहे. याची जाणीव राज्यातील प्रत्येक नागरिकांना झाली पाहिजे. तरच शासकीय अनुदानाचा योग्य प्रकारे वापर होईल.

राज्यात औद्योगिकीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात येत आहे. मात्र त्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत नाही. झाडे लावली जातात ती सुद्धा कार्यक्रमापुरते त्यामुळे उन्हाळ्यात उष्णतेचा पारा चढू लागला आहे. अंगाची लाहीलाही होत आहे. याचा पण विचार देशातील नागरिकांनी करणे गरजेचे आहे. देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून औद्योगिक बदल घडणे गरजेचे असते. याचा अर्थ असा नव्हे की, झाडांचा नायनाट करणे. तेव्हा दरवर्षी प्रत्येकांनी न विसरता आपल्या परिसरात पावसाळ्यात झाड लावलेच पाहिजे असा संकल्प करुया.

**रवींद्र तांबे**

# वाढती लोकसंख्या आणि उपाययोजनांची अंमलबजावणी




११ जुलै हा 'जागतिक लोकसंख्या दिन'. जागतिक लोकसंख्येच्या वाढत्या दरामुळे पुढे आलेली आह्वाने आणि सोबतच मिळालेल्या संधींचे स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्थापित केलेल्या या दिवसाचे उद्दिष्ट लोकसंख्येच्या समस्यांबद्दल आणि शाश्वत विकास, आरोग्य आणि पर्यावरणाच्या परस्परसंबंधांबद्दल जागरूकता वाढवणे हे आहे. या वर्षीची थीम (विषय), "तरुणांमध्ये गुंतवणूक करणे' अशी आहे. आपले भविष्य घडवण्यात तरुणांची महत्त्वाची भूमिका आणि त्यांना शिक्षण, रोजगाराच्या संधी आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याची गरज ह्यात अधोरेखित होते.

दरवर्षी ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यासाठी संपूर्ण जग एकत्र येते. या दिवसाची मुळे १९८७ मध्ये साजरा करण्यात आलेल्या "डे ऑफ फाइव्ह बिलियन'मध्ये सापडतात, ज्याला मानवी इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून चिह्नांकित केले गेले आहे. आजच्या घडीला जागतिक लोकसंख्या आठ अब्जांपर्यंत पोहचली आहे. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्ताने विविध गंभीर पैलूंवर लक्ष केंद्रित करून जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

**कुटूंब नियोजन:** कुटुंबाच्या आकाराविषयी माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी व्यक्तीला योग्य माहिती, ज्ञान आणि संसाधने ह्यांनी सुसज्ज करणे हा लोकसंख्या नियंत्रणाचा आधारस्तंभ आहे. जागतिक लोकसंख्या दिन कुटुंबनियोजनासाठीची संसाधने आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करतो. व्यक्तींना, विशेषत: महिलांना, त्यांच्या पुनरुत्पादक आरोग्याविषयी माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम बनवण्यामुळे लहान, निरोगी कुटुंबे आणि सुधारीत आर्थिक परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**लैंगिक समानता:** स्त्रियांचे त्यांच्या पुनरुत्पादक आरोग्यावर आणि शारीरिक स्वायत्ततेवर नियंत्रण असते तेव्हा लोकसंख्यावाढीचा दर कमी होतो. जागतिक लोकसंख्या दिन शाश्वत विकास साध्य करण्यासाठी लैंगिक समानतेच्या महत्त्वावर भर देतो. ज्ञानामुळे समर्थ झालेल्या महिला आणि लोकसंख्यावाढीच्या दरातील घट यांच्यातील स्पष्ट दुवा तो दर्शवितो. लैंगिक समानता हे लोकसंख्येच्या समस्यांचे निराकरण करण्याचे ध्येय आणि एक साधन आहे. महिला आणि मुलींना शिक्षित आणि सक्षम बनवण्यामुळे कमी जन्मदर आणि चांगले आरोग्य हे दोन्ही साधले जाते.

**आरोग्य आणि मानवी हक्क:** दर्जेदार आरोग्यसेवा, विशेषत: माता आरोग्य सेवा, महत्त्वाची आहे. जागतिक लोकसंख्या दिन पुनरुत्पादक आरोग्य आणि सर्वांसाठी निरोगी जीवन सुनिश्चित करण्यासाठीच्या हक्कांचे समर्थन करतो.

**जागरुकता :** हा दिवस लोकसंख्येच्या समस्यांबद्दल चर्चा आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी आणि गरिबी व विकास यांचा परस्परसंबंधांसाठी उत्प्रेरक आहे.

**बदलासाठी मध्यस्थी:** जागतिक लोकसंख्या दिनाने धोरणकर्ते, स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींना लोकसंख्येची चिंता प्रभावीपणे हाताळणारी धोरणे आणि कार्यक्रम तयार करण्यासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन केले आहे.

**विविधता:** वाढत्या लोकसंख्येसह, सांस्कृतिक समृद्धता ओळखणे महत्त्वाचे आहे. जागतिक लोकसंख्या दिन सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देतो आणि जागतिक वैविध्याचा विचार करणाऱ्या उपाययोजनांवर भर देतो. मानवी अनुभवाच्या विशालतेचा विचार करणा?्या उपायांची आवश्यकता तो अधोरेखित करतो.

जागतिक लोकसंख्या दिन हे एक आह्वान आहे. हा दिवस आपल्या वाढत्या लोकसंख्येच्या गुंतागुंतींचा स्वीकार आणि स्मरण करून देणारा आहे. एकत्रितपणे काम करून आपण असे भविष्य घडवू शकतो जेथे ह्या पृथ्वीग्रहावर निरोगी, भरभराट होत असलेले लोक राहतात. या दिवसाचा उपयोग आपण सकारात्मक संभाषणांसाठी, बदलाचा पुरस्कार करण्यासाठी आणि आपल्या आठ अब्ज सशक्त मानवी कुटुंबातील अविश्वसनीय विविधता साजरी करण्यासाठी करूया.

**जागतिक लोकसंख्या – एक दृष्टिक्षेप**

२०२४ पर्यंत जगाची लोकसंख्या आठ अब्जाहून अधिक असल्याचा अंदाज आहे. हा आकडा अनेक शक्यता आणि सोबतच अनेक आह्वाने घेऊन येतो. लोकसंख्येचे वितरण असमान आहे. काही प्रदेशांमध्ये झपाट्याने वाढ होते आहे तर काहींमध्ये घट होत आहे. उदाहरणार्थ, २०५० पर्यंत आफ्रिकेतील लोकसंख्येमध्ये लक्षणीय वाढ होण्याचा अंदाज आहे, जे २०५० पर्यंत जागतिक लोकसंख्येच्या वाढीपैकी निम्म्याचे योगदान देईल. याउलट, युरोप आणि पूर्व आशियाचे अनेक भाग वृद्ध लोकसंख्येशी झुंजत आहेत, जेथे कर्मचारीसंख्या कमी होते आहे.

**लोकसंख्यावाढीची आह्वाने**

**संसाधन व्यवस्थापन:** काही प्रदेशांमध्ये जलद लोकसंख्या वाढीमुळे पाणी, अन्न आणि ऊर्जेसह नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड दबाव पडतो. संसाधनांचे वाटप, पर्यावरणीय शाश्वतता आणि एकूणच कल्याणासाठी आह्वाने निर्माण झाली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास न वाढवता वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शाश्वत संसाधन व्यवस्थापनाची खात्री करणे महत्त्वाचे ठरते. जागतिक लोकसंख्या दिन हे यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते.

**आरोग्यसेवा:** लोकसंख्येचा वाढता दर आरोग्यसेवाप्रणालींवर लक्षणीय परिणाम करतो. उच्च लोकसंख्येच्या घनतेमुळे आरोग्यसेवेतील पायाभूत सुविधांवर ताण येऊ शकतो. यामुळे पुरेशी वैद्यकीय सेवा पुरवणे, रोगांचा प्रसार नियंत्रित करणे आणि माता व बालकांचे आरोग्य सुनिश्चित करणे यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

**शिक्षण:** तरुण लोकांच्या वाढत्या संख्येसाठी शिक्षणव्यवस्थेने जुळवून घेतले पाहिजे. वैयक्तिक विकास आणि आर्थिक वाढीसाठी दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे आणि ते प्रदान करण्यात अयशस्वी झाल्यास गरिबी आणि असमानतेचे चक्र कायम राहू शकते.

**रोजगार:** अनेक विकसनशील देशांमध्ये तरुणांची बेरोजगारी ही एक महत्त्वाची चिंता आहे. तरुणांची लोकसंख्या जसजशी वाढत जाते, तसतसे लोकसंख्याशास्त्रीय लाभांशांचा उपयोग करून घेण्यासाठी आणि सामाजिक अशांतता रोखण्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे महत्त्वाचे ठरते.

**लोकसंख्याशास्त्रीय लाभांश:** तरुणांची वाढती लोकसंख्या आर्थिक वाढीच्या संधी उपलब्ध करून देते. याला ङ्गडेमोग्राफिक्फक डिव्हिडंडफ असे संबोधले जाते. शिक्षण आणि रोजगारनिर्मितीमध्ये योग्य गुंतवणुकीमुळे तरुण नवनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देऊ शकतात.

**शाश्वत विकास:** शाश्वत व्यवस्थापन केल्यास लोकसंख्यावाढ आर्थिक विकासाला चालना देऊ शकते. हरित तंत्रज्ञान, नूतनीकरणक्षम ऊर्जा आणि शाश्वत शेतीमधील गुंतवणूक हेच दर्शविते की लोकसंख्यावाढ पर्यावरणीय टिकाऊपणापासून वंचित होण्याऐवजी पर्यावरणविकासात योगदानच देते.

शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करणे लोकसंख्यावाढीचे व्यवस्थापन करण्याशी निगडीत आहे. पर्यावरणाच्या खर्चावर आर्थिक वाढ होणार नाही याची खात्री करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे.

**सांस्कृतिक देवाणघेवाण आणि नवोपक्रम:** वैविध्यपूर्ण आणि वाढती लोकसंख्या सांस्कृतिक देवाणघेवाण आणि नवकल्पनांना वाव देते. स्थलांतर आणि शहरीकरण यांमुळे वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील लोक एकत्र येतात. यामुळे सर्जनशीलतेला आणि नवीन कल्पनांना प्रोत्साहन मिळते. यामुळे सामाजिक आणि आर्थिक प्रगती साध्य होऊ शकते.

**तरुणांमध्ये गुंतवणूक करून पुढे जाण्याचा मार्ग:** "तरुणांमध्ये गुंतवणूक' ची थीम (विषय) तरुण पिढीला सक्षम बनवण्याची गरज अधोरेखित करते. हे साध्य करण्यासाठी येथे काही धोरणे खालीलप्रमाणे:

**दर्जेदार शिक्षण:** भविष्यातील नोकरीच्या बाजारपेठेसाठी तयार करण्यासाठी डढएच (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) आणि डिजिटल कौशल्यांवर भर देऊन, सर्व मुलांसाठी आणि तरुणांसाठी दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करावे.

**आरोग्यविषयक सेवांची उपलब्धता:** लैंगिक आणि प्रजनन आरोग्यशिक्षण आणि आरोग्यसेवांसह सर्वसमावेशक सेवा प्रदान करण्यासाठी, माता आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी आणि एकंदर कल्याणासाठी आरोग्यसेवाप्रणालींमध्ये सुधारणा कराव्या.

**आर्थिक संधी:** उद्योजकता, व्यावसायिक प्रशिक्षण आणि आर्थिक वैविध्याला समर्थन देणाऱ्या धोरणांद्वारे नोकरीच्या संधी निर्माण कराव्या.

**तरुणांचा सहभाग:** सर्व स्तरांवरील निर्णयप्रक्रियेत तरुणांच्या सहभागाला प्रोत्साहन द्यावे. त्यांच्या भविष्यावर परिणाम करणारी धोरणे तयार करण्यात तरुणांचा आवाज असेल याची खात्री करावी. जागतिक लोकसंख्येचा महत्त्वाचा भाग तरुण असल्याने, धोरणनिर्मिती आणि अंमलबजावणीमध्ये त्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. शिक्षण, रोजगार आणि राजकारण ही प्रमुख क्षेत्रे आहेत जिथे तरुणांचा महत्त्वपूर्ण प्रभाव पडू शकतो.

**निष्कर्ष:** जागतिक लोकसंख्या दिन हा जागतिक लोकसंख्येच्या प्रवाहाशी (ट्रेंडशी) संबंधित बहुआयामी समस्यांवर चर्चा करण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठीचे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. ङ्गतरुणांमध्ये गुंतवणूकफ्वर लक्ष केंद्रित करून, भविष्यात तरुण लोकांची मध्यवर्ती भूमिका आम्ही स्वीकारतो. शिक्षण, आरोग्यसेवा आणि आर्थिक संधींमध्ये धोरणात्मक गुंतवणुकीसह, आम्ही शाश्वत विकास आणि सर्वांसाठी समृद्ध भविष्य सुनिश्चित करून, जगातील तरुणांच्या क्षमतेचा उपयोग करू शकतो.

लोकसंख्येशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यात सरकार, शासकीय आणि निमशासकीय तसेच खाजगी संस्था व धर्मादाय ट्रस्ट (एनजीओ) आणि आंतरराष्ट्रीय संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. शाश्वत शेती, नूतनीकरणक्षम ऊर्जा आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यांना प्रोत्साहन देणारी धोरणे आवश्यक आहेत. याव्यतिरिक्त, लोकसंख्या वाढीचे व्यवस्थापन करण्यासाठी, विशेषत: मुलींसाठी शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि आरोग्यसेवांमध्ये प्रवेश वाढवणे हे कार्यक्रम महत्त्वाचे आहेत.

बांगलादेश आणि थायलंडसारख्या देशांनी सर्वसमावेशक कुटुंबनियोजन कार्यक्रमांद्वारे जन्मदर कमी करण्यासाठी लक्षणीय प्रगती केली आहे. दरम्यान, जपान आणि जर्मनीसारख्या राष्ट्रांना वृद्ध लोकसंख्येशी संबंधित आह्वानांचा सामना करावा लागतो आहे. उच्च जन्मदर आणि स्थलांतरितांच्या चांगल्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठीची धोरणे ते राबवत आहेत.

जागतिक लोकसंख्या दिवस हा चिंतन आणि कृती करण्याची वेळ आहे. वाढत्या जागतिक लोकसंख्येच्या गुंतागुंतीकडे गांभीर्याने लक्ष केंद्रीत करत असताना, शाश्वत विकास, लैंगिक समानता आणि तरुण लोकांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. या समस्यांना एकत्रितपणे आणि सक्रियपणे संबोधित करून, असे भविष्य घडवू शकतो जेथे सर्व व्यक्तींना संतुलित आणि शाश्वत जगात भरभराटीची संधी असेल.

हा दिवस केवळ आकड्यांची आठवण करून देणारा नाही तर मानवतेच्या भल्यासाठीच कृती करण्याची हाक आहे. आपला ग्रह भावी पिढ्यांसाठी एक व्यवहार्य घर राहील याची खात्री करून जागतिक स्तरावर विचार करण्यास आणि स्थानिक पातळीवर कार्य करण्यास तो आपल्याला उद्युक्त करतो.

**– डॉ. सुनील दादा पाटील,**
द्वारा, कवितासागर फिचर्स,
पोस्ट बॉक्स ६९, नांदणी
नाक्याजवळ, बायपास रोड,
जयसिंगपूर – ४१६१०१,
जिल्हा – कोल्हापूर, महाराष्ट्र
संपर्क – ९९७५८७३५६९,
८४८४९८६०६४,
०२३२२२२५५००, sunildadapatil@gmail.com

# आमगाव नगरपरिषदेच्या विषयावर आ.कोरेटेंचे विधानभवनात आंदोलन

**आमगाव:–** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आमगाव नगर परिषद संघर्ष समिती कडून नगर परिषद परिक्षेत्रातील आठ गावातील नागरिकांनी स्वंस्फुर्तपणे मतदानावर बहिष्कार टाकला होता. यात राज्याचे उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमगाव येथे १४ एप्रिलला बाबासाहेबांना अभिवादन करून नगर परिषद संघर्ष समितीच्या प्रतिनिधी मंडळाला आश्वासन देऊन झालेल्या सभेत नगर परिषदेचे न्यायालयीन प्रकरण निकाली काढणार असे विश्वास त्यांनी दिले होते.परंतु लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सलग महिना लोटूनही जिल्ह्यातील पुढारी या विषयावर गप्प बसल्याने आज आमगाव देवरी मतदारसंघाचे आमदार सहसराम कोरेटे यांनी विधानभवनाच्या पायऱ्यावर आमगाव नगरपरिषदेचा मुद्दा निकाली काढण्याचे फलक हाती घेत आंदोलन केले.

नागरीकांना मागील दहा वर्षांपासून राज्य सरकारने नगर पंचायत ते नगर परिषदचा वाद मिटवता आला नाही .सर्वोच्च न्यायालयात याबाबद पीटिशन अपील करून निर्णय घेता आले नाही त्यामुळे नागरीकांना मागील दहा वर्षांपासून विकास योजनेपासून वंचित व्हावे लागत आहे.आता हा विषय नागरिकांनी पेटउन घेतला आहे. निर्णय नाही तर राज्यातील विधानसभा निवडणुकीत मतदान नाही अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

आमगाव नगर परिषद स्थापनेचा विषय राज्य सरकारने मागील १० वर्षापासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित ठेवले असून अद्याप ही या प्रकरणावर निर्णय घेतला नाही.त्यामुळे नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित ठरलें आहे. आता हा विषय नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया घेऊन नगर परिषद संघर्ष समितीच्या माध्यमाने निर्धार करून नगर परिषद परिक्षेत्रातील आठ गाव येथील नागरिकांनी येणाऱ्या पुढील निवडणुकीवर बहिष्कार घालण्याच्या निर्धार केला आहे.

आमगाव नगर परिषद संघर्ष समितीच्या माध्यमाने नगर परिषद स्थापनेचा न्यायप्रविष्ठ प्रकरण राज्य सरकारने निकाली काढावे यासाठी अनेक प्रयत्न केले. आंदोलने, मोर्चे काढून राज्य सरकारने न्याय प्रविष्ट प्रकरण निकाली काढले नाहीं. राज्य सरकारने नगर परिषद स्थापनेचा विषय प्रलंबित ठेऊन आठ गावातील नागरीकांना मिळणाऱ्या योजना सुविधांपासून वंचित ठेवले. आमदार सहेसाराम कोरोटे यांनी विधानभवन येथे नगर परिषद प्रलंबीत प्रश्न निकाली काढावे यासाठी फ्फलक घेऊन राज्य सरकारचे लक्ष वेधले .या भूमिकेचे नगर परिषद संघर्ष समिती पूर्णत: समर्थन करीत आहे. लोकप्रतिनिधींनी याविषयी अधिक संघर्ष निर्माण करून हा प्रश्न निकाली काढावे.असे मत संघर्ष समिती कडून व्यक्त करण्यात आले आहे

# लाडकी बहीण योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावे-माजी आमदार राजेंद्र जैन

**गोंदिया:** राज्यातील महायुति सरकार ने नुकतीच महिलाचे सबलीकरण व आत्मनिर्भर करण्यासाठी मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण महत्वकांक्षी योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा याकरिता महिलांच्या सहकार्यार्थ सहायता केंद्र सुरु करण्यात आले आहे.

खासदार प्रफुल पटेल यांच्या निर्देशानुसार व माजी आमदार श्री राजेन्द्र जैन यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी कांग्रेस भवन (कार्यालय), रेलटोली गोंदिया येथे महिलांच्या सहकार्यार्थ योजनेच्या सुविधेकरिता सहायता केंद्र सुरु करण्यात आले आहे. यात महिला सोबत पुरुष कार्यकर्त्यांची ची टीम ऑनलाईन आणि ऑफलाइन आवेदन फार्म भरून जमा करण्यात येत आहे.

माजी आमदार राजेन्द्र जैन म्हणाले कि, मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण महत्वकांक्षी योजनेचा लाभ प्रत्येक लाभार्थी महिलांना मिळाला पाहिजेत या करीता आमचा लक्ष आहे. सेतू केंद्र व अन्य ठिकाणी आवेदन भरण्यास होत असलेल्या अडचणीचा सामना करावा लागू नये याकरिता सहायता केंद्र सुरु करण्यात आले आहे. राष्ट्रवादी कांग्रेस भवन (कार्यालय), रेलटोली येथे येऊन महिला योजनेचे आवेदन भरू शकतात.



सदर योजनेचा आवेदन फॉर्म भरण्यास सुविधा व्हावी याकरिता मार्गदर्शन व सहयोग प्रदान करण्यास एक यूनिट तयार करण्यात आले आहे. योजनेचा लाभ घेणारी महिला एक फोटो, अपडेट आधार कार्ड, राज्याचा रहिवाशी दाखला नसेल तरजन्म प्रमाणपत्र, पिवळे किव्हा केशरी राशन कार्ड, टी. सी, बँक पास बुक, मतदान कार्ड, अन्य झेरोक्स कॉपी व दुसऱ्या राज्यातील महिला लग्नानंतर महाराष्ट्रातील रहिवासी असल्यास वरील दस्तावेज किव्हा नसल्यास पतिची टी. सी, या जन्म प्रमाणपत्र यापैकी कोणताही पुरावा घेऊन आवेदन भरावे व या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी आमदार राजेन्द्र जैन यांनी केले आहे.

# तुमसर येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे भूमीपूजन

**गोरेगाव :** १ कोटी १५ लक्ष रुपयांच्या निधीतून प्राथमिक आरोग्य उपकेंद्र भूमिपूजन तुमसर येथे संपन्न झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरोग्य सेवेवर विशेष लक्ष दिले असून नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले आहेत. रोग झाल्यावर उपचार यापेक्षा रोगच होऊ नये या दृष्टीने मोदीजी कार्य करीत आहेत.



डायरिया, मलेरिया तसेच पावसाळ्यात होणारे रोग कमी करण्यात शासनाला यश प्राप्त झाले आहे. देशात उघड्यावर शौचाला बसणाऱ्यांमुळे होणारे रोग कमी झाले कारण शौचालय बांधकामाचे काम युद्धस्तरावर करण्यात आले. सोबतच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा प्रक्रिया, सांडपाणी नदीत वाहून न जाऊ देता त्यावर प्रक्रिया करून सोडणे यामुळे नद्या सुद्धा प्रदूषणापासून वाचत आहेत. तुमसरला प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व्हावे ही मागणी आणि इच्छा व्यक्त करण्यात आली होती. आणि आज याचे भूमीपूजन करताना फार आनंद होत आहे असे मत जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी यावेळी व्यक्त करत लवकरच कार्य पूर्ण होऊन लोकार्पण पण करू असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी क्षेत्राचे आमदार मनोहरजी चंद्रिकापुरे, यशवंत गणवीर उपसभापती जिल्हा परिषद गोंदिया, डॉ. लक्ष्मण भगत जिल्हा परिषद सदस्य, रामेश्वर महारवाडे पंचायत समिती सदस्य, योगिताताई देशमुख सरपंच, विजय सहारे उपसरपंच, नरेश कोहरे उपसरपंच मेंढा, कल्पनाताई बहेकार माजी सरपंच, सुरेश रहांगडाले, जगणीत सर आणि क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.

## माजी नगराध्यक्ष के.बी.चव्हाण यांचे निधन



**गोंदिया:** गोंदिया नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष व सेवानिवृत्त प्राचार्य के.बी.चव्हाण यांचे सोमवारी रात्री ८.३० वाजता निधन झाले. त्यांच्यावर मंगळवार दुपारी २ वाजता मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यात्रेत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. मान्यवरांनी यावेळी श्रद्धांजली वाहिली.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# धार्मिक अंधश्रद्धा हे राजकीय सत्तेचे बलस्थान आहे का?

जगाच्या धर्म संकल्प धारणेत जसे मानवाला आद्य स्थान होते , तसे अंधश्रद्धेला होते का? हा प्रश्न जर कधी मानवाला पडला तर, त्याचे उत्तर मानव नकारात्मकच देइल यात शंकाच नाही. मग प्रश्न हा निर्माण होतो की, धर्मामध्ये ही अंधश्रद्धा आली कोठून? याचे उत्तर पहायचे ठरवले तर , आपल्याल जरा मागे जावे लागेल व याचे उत्तर शोधावे लागेल.

जगातल्या बहुतेक धर्म संस्थपकांनी धर्म स्थापनेपासूनच अंधश्रद्धेचा आधार घेतल्याचे आपल्या लक्षात येते. याला पुरावा म्हणजे तो आपल्याला जसा मुस्लिमांच्या कुराण या धर्मग्रंथात मिळतो, तसाच तो आपल्याला भगवदगिता व बायबल या धर्मांच्या धर्मग्रंथातही पहायला मिळतो. कुराण धर्मग्रंथचे संस्थात्मक अध्यक्ष महमद पैगंबर हे स्वत:ला अल्लाचा प्रेषित म्हणून सांगतात. तर येशू स्वत:लां देवाचा पुत्र आहे म्हणून सांगतो. तर कृष्ण स्वत:लाच देवाधी देव म्हणून घेतो. फक्त यात सर्वच धर्म संस्थापकात भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्धच हेच स्वत:लाच मानवाचा पुत्र म्हणवून घेतात व तसे जाहीरही करतात.

पण स्वत:ला प्रेशित, पुत्र व देवधी देव म्हणणाऱ्या सर्वच धर्म संस्थापकांना जर एक एक प्रश्न ठळकपणे विचारला की "तुम्ही कोण्यता देवाचे पुत्र किंवा प्रेशित आहेत? तो देव तुम्ही पाहिलात का?" तर याचे उत्तर त्यांनी त्यांच्याच धर्मग्रंथात दिलेले नाही. पण कृष्ण याचे उत्तर मीच देवेधी देव म्हणून देऊन ठेवलेले आहे. म्हणजेच देव कोनासारखा तर माझ्या सारखा असे कृष्ण लगेच म्हणतो. पण खरच त्याचे हे म्हणणे मानायला बाकी धर्म तयार होतील का व आजपर्यंत झालेत का? तर यांचे उत्तर नाही असेच आहे.

मग प्रश्न हा पडतो की, धर्म संस्थापकानाच देव सांगता आला नाही तर मग धर्मात देव नावाचे पात्र आलेच कसे? हा एक मोठाच प्रश्न होऊन बसतो? मग हाही प्रश्न तयार होतो की, देवाच्या नावाने हे स्तोम धर्माधर्मात माजलेच कसे व ते आजपर्यंत टिकून राहिलेच कसे? हे स्तोम टिकवून ठेण्यासाठी कोणी सर्वात जास्त पुढाकार घेतला?

तर याचे उत्तर असे आहे की, यामधे धर्माच्या नावाखाली व धर्म परचारासाठी कालांतराने जो पुरोहित वर्ग तयार झाला, त्याने आपली सुरवातीची आयती पोट भरण्याची कला म्हणून याकडे पाहिले व ती सुरळीत सुरू रहावी म्हणून धर्माचे स्तोम माजवले. असा त्याचा सरळ व साधा अर्थ निघतो. म्हणूनच ख्रीस्ती धर्मात मार्टिन ल्युथर यांनी, मुस्लिम धर्मात मुस्लिम संतांनी व हिंदु धर्मात सर्व संत, चार्वाका पासून फ्फुले शाहू आंबेडकरापर्यंत सर्वांनीच पुरोहितशाही विरूद्ध बंड केले. यात म.फुलेंनी सत्यशोधक धर्म स्थापला. तर डा.आंबेडकरांनी बौद्ध धर्मात धर्मांतर केले. तसेच हिंदु धर्मातून शीख, मुस्लिम व खिरस्ती धर्मात गेले ते वेगळेच. याला कारण म्हणजे धर्ममर्तडानी धर्मात मजवलेले अंधश्रद्धेचे स्तोम हे होय.

पण आजही कोणत्याच धर्मातील पुरोहित किंवा धर्ममार्तंड आपापल्या धर्मातील अंधश्रद्धा सोडायला तयार नाहीत.. कारण आज याच अंधश्रध्येला राजकीय वळण लागलेले आहे.

आज याच अंधश्रद्धला सर्वात मोठे हत्यार म्हणून तेच पूर्वीचे पुरोहित व धर्ममार्तंड आपली राजकीय सत्ता टिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग करीत आहेत. म्हणजेच आज धर्म हा श्रद्धेचा नाही तर राजकीय स्तेचा सर्वात मोठा भाग झालेला आहे.

म्हणजेच अंधश्रद्धा पसरावा व राज्य करा असे तत्व आज पुरोहित धर्ममर्तडानी स्वीकारलेले आहे व जनता आपली राजकीय गुलाम धर्माच्या नावावर कशी राहील येवठ्या पुरतीच मर्यादित ठेवलेली आहे. आम्ही धर्माच्या नावावर तुम्हाला जेवढे देतोय तेवढेच घ्या व गप्प बसा हे त्यांचे आजचे राजकीय तत्व आहे आणि विशेष म्हणजे याच तत्वाची आज जनताही गुलाम झालेली आहे. हे आजपर्यंतच्या कित्येक निवडणुकीवरून समजून आलेले आहे. कारण देश, जन्मभूमी व राष्ट्रवाद यांच्या पेक्षा राज्यकर्ते धर्माचे स्तोम मजवण्यात व धर्मावरून धर्मा धर्मात भाडणे लावण्यात व धार्मिक दंगली घडवून, हिंसाचार-रक्तपात घडवून आणण्यात ते आजपर्यंत यशस्वी झालेले आहेत. म्हणजेच जनतेला नेमके काय दिले पाहिजे हे त्यांच्या चांगले लक्षात येवून पूर्णपणे स्मजलेलेही आहे.

तेंव्हा अंधाश्रधेतून देशप्रेम की देशप्रेमाने राजकारण हे ठरवण्याची आज वेळ आलेली आहे. म्हणजेच धर्ममार्तंड यांचे गुलाम होऊन देशाच्या राजकिय सत्तेपर्यंत पोहचायचे की अंधश्रध्दा हिला पायदळी तुडवून आपली राजकीय सत्ता आपल्या ताब्यात घ्यायची, हे आज त्या त्या धर्माच्या सर्व सामान्य माणसांनी ठरवण्याची वेळ आलेली आहे. असे मला वाटते.

**दिपक गायकवाड सर**

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.१० जुलै २०२४ ३

# आरक्षण नाकारणाऱ्यालाच यादीत स्थान

## जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाची पदभरती; सामान्य प्रशासनाचा घोळ

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात सरळ सेवा पदभरतीत मागासप्रवर्गासाठी राखीव असलेल्या यादीत त्या प्रवर्गातील उमेदवाराला वगळून ज्या उमेदवाराने आरक्षण नाकारत खुल्या प्रवर्गातून अर्ज केला, त्या उमेदवाराचा समावेश करण्यात आला. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. तर अन्याय झाल्याची तक्राार केल्यानंतर या प्रकरणात सारसारव करण्यात आली.



गोंदिया जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकरिता फार्मसी अधिकारी या पदाकरिता घेण्यात आलेल्या पदभरतीमध्ये जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने महिला आरक्षण ठरवितांना घोळ केल्याने प्रकरण समोर आले आहे. विशेष म्हणजे या पदाकरिता जी निवड यादी प्रकाशित करण्यात आली, त्या निवड यादीमध्ये आरक्षित महिला गटातून अर्ज करणाऱ्या उमेदवाराला डावलून त्या महिला आरक्षणात सामान्य प्रवर्गातील एका महिलेला घालण्यात आल्याने जिल्हा परिषदेतील नोकरभरतीचा सावळागोंधळ भ्रष्टाचाराला आमंत्रण देणारा ठरला आहे. उल्लेखनीय म्हणजे आरोग्य विभागात निघालेल्या भरतीमध्ये ज्यांनी महिला प्रवर्गात ज्याने अर्ज केला, त्यालाच घ्यायला हवे होते. परंतु सर्वसाधारण गटात असलेल्या महिलेलाा राखीव गटात आणल्याने जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागातील घोळ समोर आला आहे. जिल्हा परिषद गोंदियाच्या गट क मधील सरळ सेवेत रिक्त पदे भरती प्रक्रिया २०२३ अंतर्गत घेण्यात आलेल्या औषध निर्माण अधिकारी पदाचा निकाल जाहिर करुन निवड यादी लावण्यात आली.

त्यानुसार निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्राच्या पडताळणीकरिता ईमेल संदेशाच्या माध्यमातून आचारसंहिता काळात १६ मे २०२४ रोजी गोंदिया जिल्हा परिषदेत बोलावण्यात आले. त्यानुसार तक्रारदार महिलेने संकेतस्थळावर पाहणी केली असता शितल श्रावण भेंडारकर या महिला उमेदवााने महिला आरक्षण घेतलेले नसताना सुद्धा सदर महिला उमेदवारास महिला आरक्षित जागेकरिता इतर मागास प्रवर्गातून पात्र करण्यात आले. त्यामुळे जाहिरातीमधील नियम अटी शर्तीचेच उल्लघंन जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या कर्मचाऱ्याने यादी तयार करताना का केले? हा प्रश्न या माध्यमातून उपस्थित झालेला आहे. जाहिरातीनुसार औषध निर्माता अधिकारी ९ पद, ओपन ३ (२ खुले व १ महिला), २ ओबीसी (१ खुला व १ महिला), गुणवत्तेनुसार पहिले ३ हे खुल्या प्रवर्गात जायला हवे होते.

### तक्रारीनंतर सारवासारवची भूमिका

**विशेष म्हणजे ज्या महिला उमेदवारांने अर्जातच महिला आरक्षण नाकारले. त्या उमेदवाराला महिला आरक्षणात कसे घेण्यात आले. औषध निर्माता अधिकारी पदामध्ये हा घोळ का करण्यात आला? अशी तक्रारच एका महिला उमेदवाराने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाकडे केली. त्या तक्रारीनंतर कुठे प्रकरणाची सारवासारव करुन निवड यादी दुरुस्त करण्यात आले असले तरी ज्यांनी तक्रार केली नसेल अशांच्या बाबतीत खरंच त्यांना न्याय मिळाला असेल काय?अशी चर्चा सुरु झाली आहे.**

# पासपोर्टसाठी जिल्ह्यात ९० दिवसांचे वेटिंग

**गोंदिया:** पासपोर्ट काढण्यातील त्रुटी मागील काही वर्षात दूर झाल्याने आता अवघ्या दहा ते पंधरा दिवसांतही पासपोर्ट काढून मिळतो. काही तांत्रिक तसेच अन्य कारणांमुळे काही वेळा हाच पासपोर्ट मिळण्यात ९० दिवसांचाही कालावधी लागतो. परंतु तोच पासपोर्ट घेण्यासाठी एखादा एजंट गाठल्यास ते मिळण्याची गती वाढते. अशीही माहिती समोर आली आहे.

### पासपोर्टसाठी काय कागापदत्रे लागतील

पासपोर्ट काढण्यासाठी जन्मदाखला, लिव्हिंग सर्टिफिकेट, रहिवासी दाखला, स्वत:चे ओळखपत्र, बँकेचे पासबुक, आधारकार्ड आदी महत्वाच्या कागदपत्रांची गरज लागते. तर पासपोर्ट काढतेवेळी मुळ प्रतीसह झेरॉक्स प्रत जवळ बाळगणे आवश्यक असते.

### मुलाखतीसाठी वेटिंग

**पासपोर्ट कार्यालयात ऑनलाईन अर्ज केल्यानंतर आधी कागदपत्रांची पडताळणी होते. त्यानंतर संबंधित अर्जदाराला नागपूर येथील पारपत्र कार्यालयात अर्ज केल्यानंतर संबंधित पोलीस ठाण्यात मुलाखतीसाठी बोलवले जाते. याठिकाणी मुळ कागदपत्रांची पडताळणी केली जाते. परंतु या मुलाखतीसाठी किमान ९० ते १०० दिवसाचे वेटिंग असते.**

### पोस्टाने पाठवला जातो पासपोर्ट

**पासपोर्टसाठी अर्ज केल्यानंतर सर्व कागदपत्रांची छाननी होते. त्यानंतर या कार्यालयातून पासपोर्ट प्रिटींगसाठी जातो. त्यानंतर तो संबंधित व्यक्तीकडे पोस्टाने पाठविला जातो. या सर्व प्रक्रियेसाठी किमान ९० दिवसाचा अवधी लाागतो. अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.**

### दिवसाला २५ अर्जाची पडताळणी




**गोंदिया जिल्ह्यातून परदेशात पर्यटन, शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळेच पासपोर्ट मिळविणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्जाची पडताळणी केली जाते. पोलिस विभागाला अर्ज प्राप्त लक्षणीय आहे. त्यामुळेच दिवसाला किमान २० अर्जाची पडताााळणी होत असल्याची माहिती सुत्रांनी दिली.**

**पत्याचा पुरावा काय चालतो?** पासपोर्टसाठी मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, वीज बिल, टेलिफोन बिल, भाडेकरार तसेच पत्ता असलेले बँकेचे पासबुक आदीपैकी कोणतेही एक दस्ताऐवज पासपोर्ट कार्यालयात पडताळणी करावी लागते.

# अखेर विद्यार्थी पालकांच्या आंदोलनासमोर मुकाअना करावी लागली शिक्षकांची बदली रद्द



**देवरी:-** बऱ्याच वर्षापासून बंद पडलेली जिल्हा परिषद हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय मागील पाच वर्षापूर्वी सुरु करण्यात आली. ६ मुलांपासून सुरु करण्यात आलेल्या शाळेत आज ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या शाळेला संचमान्यता देण्याचे काम जिल्हा परिषदेचे शिक्षण विभाग करु शकले नाही. उलट ज्या शिक्षकांमुळे ही शाळा पुन्हा नावलौकीक मिळवू लागली त्या ३ शिक्षक मंगलमुर्ती सयाम,वाघदेवे व चोपकर यांची बदली नियमावर बोट ठेवून केल्याने विद्यार्थ्यांसह पालकांत प्रचंड असंतोष उफाळून आला. आणि ८ जुर्ले रोजी सर्व पालक व विद्यार्थ्यांनी शाळेसमोरच जोपर्यंत आमच्या शिक्षकांची बदली रद्द होत नाही, तोपर्यंत शाळेत जाणार नाही अशी भुमिका घेत आंदोलनाला सुरवात करीता जिल्हा परिषद प्रशासनविरोधात रोष व्यक्त केला. त्यातच बदली करण्यात आलेल्या शिक्षकांचे आदेश रद्द करा अन्यथा आमच्या पाल्यांची टि.सी.द्या ही भूमिका घेतल्याने अजूनच गोंधळ वाढला. त्यामुळे गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे यांनी आंदोलक पालक व विद्यार्थांची बाजू समजून घेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहिती दिली.शेवटी विद्यार्थी ऐकत नसल्याचे व स्थिती हातून जात असल्याचे समजताच मुख्य कार्यकारी अधिकारी मुरगानाथम एम यांनी देवरीची जिल्हा परिषद हायस्कुल गाठली. आणि बदली झालेल्या शिक्षकांचे आदेश रद्द करीत १५ दिवसात शाळेला संच मान्यता मिळवून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर पालकासंह विद्यार्थ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. पाच वर्ष लोटूनही संच मान्यता मिळाली नाही यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही उपस्थितांसमोर खेद व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजे यासाठी शासन सर्वोतपरी प्रयत्न करीत असतांना ममांगेल त्या ठिकाणी जिल्हा परिषद शाळेतील ६२६ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्याचे प्रशासन म्हणत असले तरी या बदली प्रकियेत अधिकारी यांनी आपण जे म्हणू तीच दिशा ठरवल्याने अनेक शिक्षकांवर अन्यायही झाल्याचे दिसून आले. सहा वर्षापुर्वी बदली पोर्टलच्या चुकीमुळे जे शिक्षक विस्थापित झाले,त्यांना ज्या शाळा दिल्या तिथे त्यांनी काम केले.मात्र यावेळी बदलीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी त्यांची बाजू न ऐकता बदल्यांचे धोरण राबविल्याने पुन्हा त्यांच्यावर त्याच शाळेत राहण्याचीही वेळ आली.

शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ सुरू होऊन आठवडा लोटला आहे. त्यात शिक्षकांच्या झालेल्या बदल्यामुंळे अनेक शाळेत नविन शिक्षक रुजु झालेत. असाच प्रकार देवरी शहरातील जिप हायस्कुलबाबत झाला. येथे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जे शिक्षक होते. त्यातील तिन शिक्षकांची बदली झाली. पंरतु विद्यार्थांनी आमचे शिक्षक आम्हाला परत करा, या मागणीला जोर धरत विद्यार्थांनी शासन व प्रशासनाचा निषेध नोंदविला.

तिन्ही शिक्षकांची बदली रद्द होत नाही, तोपर्यंत विद्यार्थीही शाळेत बसणार नसल्याची भूमिकाच विद्यार्थांनी घेत शिक्षकांची बदली करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी जोपर्यत येऊन आम्हाला आश्वासन देत नाहीत. तोपर्यंत शाळेबाहेर आमचे आंदोलन सुरूच राहणार,अशी भूमिका घेणाऱ्या विद्यार्थी व पालकांशी मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानाथम एम यांनी शाळेत येऊन संवाद साधत त्यांच्या मागण्या मान्य करीत आंदोलन संपविले.

# खांबी येथे द्या बसचा थांबा, विद्यार्थ्यांसह प्रवाशांची मागणी

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील बोंडगावदेवी ते अर्जुनी मोरगाव मार्गावर धावणाऱ्या सर्व बसफेऱ्यांना खांबी येथे थांबा देण्यात यावा, अशी मागणी विद्यार्थी, प्रवासी व ग्रामपंचायतीने केली आहे. तालुक्यातील खांबी हे गाव महत्त्वाचे गाव असून येथे बसथांबा आहे.मात्र या बसथांबावर काही बस फेऱ्या येतात, तर काही परस्पर अर्जुनी मोरगाव वा बोंडगावदेवी येथे नेल्या जातात. त्यामुळे परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून इतर प्रवाश्यांना सुद्धा या समस्येला दररोज तोंड द्यावे लागते आहे.



साकोली व भंडारा आगाराच्या बोंडगावदेवीवरून अर्जुनी मोरगांव मार्गे जाणाऱ्या बसेस आहेत. त्या सर्व बसेस बोंडगावदेवी ते खांबी या मार्गाने न जाऊ देता चालक आपल्या मनमर्जीने सरळ बोंडगावदेवी ते निमगांव, अर्जुनी मोरगांव मार्गे जाऊ देतात. त्यामुळे प्रवाशांना दोन दोन तास दुसऱ्या बसची वाट पाहावी लागते. परिणामी प्रवाशांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असून नियोजित कामे खोळंबतात. त्यामुळे संबंधित अधिकारी व प्रशासनाने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान होणार नाही, प्रवाशांना त्यांच्या नियोजित वेळेत पोहचता यावे, यासाठी साकोली व भंडारा आगाराच्या अर्जुनी मोरगावमार्गे जाणाऱ्या-येणाऱ्या सर्व बसेसचा थांबा खांबी येथे द्यावा, अशी मागणी विद्यार्थी, प्रवासी व ग्रामपंचायतीने केली आहे. खांबी येथे अनेक बसर्फेऱ्या पोहचत नसल्याने तसेच पोहचणाऱ्या बसेसमध्ये एक ते दोन तासाचे अंतर असल्याने प्रवासी व विद्यार्थ्यांना जवळील दीड ते दोन किमी अंतरावरील बसथांब्यावर पायपीट करुन बस पकडावी लागते.

# महिलांचे सशक्तीकरण व आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने सरकारचे महत्वपूर्ण पाऊल-माजी आमदार राजेंद्र जैन

**गोंदिया:-** शहर व ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पक्ष पदाधिकारी व कार्यकत्यांची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस भवन, गोंदिया येथे माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. पक्षाची विचारधारा व पक्ष संघटन मजबूत करणे, महिलांचे सशक्तीकरण, स्वावलंबनासाठी मुख्यमंत्री-माझी लाडली बहन योजना, शेतकऱ्यांचे कृषी वीज बिल माफ्फ करणे, शेतकऱ्यांच्या दूध दराला प्रति लिटर ५ रु अनुदान, महिलांना पिंक इ-रिक्षाचे वाटप, मुलींना निशुल्क उच्च शिक्षण सहित अनेक महायुती सरकारचे जनहितार्थ निर्णय जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य करावे यावर माजी आमदार राजेंद्र जैन यांनी संबोधित केले.




नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनातफर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना जाहीर करण्यात आली. महिलांचे आर्थिक सशक्तीकरण, स्वावलंबन व आत्मनिर्भर करण्यासाठी जुलै २०२४ पासून दर महिन्याला १५०० रु. तसेच महिलांच्या सक्षमीकरणाकरिता अनेक योजना जाहीर केल्याने गोंदिया जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व खासदार प्रफ्फुल पटेल यांचे आभार मानले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्याकरीता राष्ट्रवादी काँग्रेस भवन, रेलटोली कार्यालय, गोंदिया येथे माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या उपस्थितीत पात्र लाभार्थी महिलांचे अर्ज भरून सहायता केंद्र सुरु करण्यात आले व दररोज लाभार्थ्यांचे अर्ज भरण्यात येईल.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, प्रेमकुमार रहांगडाले, बाळकृष्ण पटले, कुंदन कटारे, नानू मुदलियार, माधुरी नासरे, केतन तुरकर, मोहन पटले, अखिलेश शेठ, नीरज उपवंशी, शंकरलाल टेंभरे, रवीकुमार पटले, मनोहर वालदे, शिवलाल जमरे, विनीत सहारे, राजेश जमरे, चंदन गजभिये, नितीन टेंभरे, करण टेकाम, रमेश गौतम, विजेंद्र जैन, आशाताई पाटील, कीर्ती पटले, रुचिता चव्हाण, शर्मिला पाल, अनिता जैतवार, पुस्तकला माने, मोनिका सोनवाने, मदन चिखलोंडे, रमेश कुरील, लिकेश चिखलोंडे, हर्षवर्धन मेश्राम, राधेश्याम पटले, टी एम पटले, चंद्रकुमार चुटे, एकनाथ वहिले, संजीव राय, राज शुक्ला, संजय राऊत, प्रदीप रोकडे, हितेश पतेह, पवन पटले, पन्नालाल डहारे, नागो बनसोड, अनुज जायसवाल, गोविंद लिचडे, श्रावण ठकरांनी, हरिराम आसवानी, पंकज चौधरी, योगेश पतेह, योगेश कन्सरे, अनिल खरोले, दिलीप डोंगरे, विजेंद्र बोरकर, सुरेश चुटे, प्रमोद कोसरकर, सुनिल पटले, शैलेश वासनिक, आरजू मेश्राम, कपिल बावनथडे, कान्हा बघेले, खुशाल कटरे, राहुल गजबे, डी, एम पाटील, दर्पण वानखेडे, शरभ मिश्रा, मंगेश रंगारी, श्रेयस खोब्रागडे, कुणाल बावनथडे, रवींद्र किसने, कमलेश मेश्राम, वामन गेडाम सहित मोठया संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# वसुंधरेला हिरवीगार करण्यासाठी "वृक्षधारा"ची धडपड

**गोंदिया :** वसुंधरेवरील म्हणजेच पृथ्वीवरील वने, माती, हवा, पाणी व जैवविविधता यांसह सर्व नैसर्गिक संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे, तसेच पुढील पिढ्यांसाठी त्यांचे संवर्धन करणे, मानवनिर्मित कृतीमुळे पृथ्वीवर होणारे प्रदूषण व पर्यावरणाची नासाडी रोखणे किंवा त्याला आळा घालणे. याविषयी जनजागृती होण्याची गरज आहे. दरम्यान, पर्यावरणाचा समतोल राखता यावा यासाठी गोंदियातील वृक्षधारा फाऊंडेशनच्या युवकांची धडपड सुरू असून फाऊंडेशनच्या माध्यमातून युवक दररोज वेगवेगळ्या भागात रोपे लावून वसूंधरेला पूर्वीसारखी हिरवीगार करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यात आतापर्यंत ९ हजारांहून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली असून या वृक्षांचे संवर्धन केले जात आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार, गेल्या १० वर्षात पृथ्वीच्या तापमानात जेवढी वाढ झाली आहे, त्यापैकी ८५ टक्के तापमानवाढ एकट्या कार्बन डायऑक्साइडमुळे झाली आहे. खनिज इंधने ही मानवनिर्मित कार्बन डायऑक्साइडच्या उत्सर्जनाचे मोठे स्रोत आहेत. आपण ज्या-ज्या वेळी वाहनांचा व ऊर्जेचा अतिरेकी वापर करत असतो. त्या-त्या वेळी खनिज इंधने जाळून कार्बन डायऑक्साइडची निर्मिती करत आपण जागतिक तापमानवाढीला हातभार लावत असतो. आपल्या इतर छोट्यामोठ्या कृतीतूनही पर्यावरणास घातक ठरणाऱ्या वायूंची निर्मिती होत असते. दरम्यान, झाडे आपल्याला केवळ ऑक्सिजन देत नाहीत तर आपल्याला फुले, फळे, औषधे आणि लाकूड देखील देतात. तेव्हा वृक्षारोपण करून रोपट्यांना संवर्धन करण्याचे कार्य गोंदियातील वृक्षधारा फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येत आहे. तर या सामाजिक कार्यात नागरिकांचाही सहभाग वाढावा स्वतः रोपटे लावण्यासाठी तयार व्हावेत आणि त्यांच्या आजूबाजूच्या लोकांनाही या उदात्त कार्यासाठी प्रेरणा मिळावी, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.



या फाऊंडेशनची सुरुवात २०१६ मध्ये नागपुरातून करण्यात आली. मात्र, २०२० यावर्षी कोरोनासारख्या गंभीर आजाराच्या प्रादुर्भावामुळे वृक्षारोपणाचे काम पूर्णपणे प्रभावित झाले. त्यातच कोरोनामुळे नोकरी गमावलेले तरुण या फाउंडेशनमध्ये सामील झाले आहेत. या फाउंडेशनच्या सहा शाखा असून या फाउंडेशनच्या माध्यमातून दररोज २०० हून अधिक तरुण रोपटे लावण्याचे काम करत आहेत. इतकंच नाही तर प्रत्येक रविवारी फाऊंडेशनचे सदस्य रोपांची काळजी घेत असून लावलेली रोपटी जिवंत आहेत की, नाही याची तपासणी करतात. विशेष म्हणजे, आतापर्यंत फाऊंडेशन तर्फे ९ हजारांहून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्यांचे संवर्धन केले जात आहे.

# विविध कृषि पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित

**गोंदिया :** कृषि विभागामार्फत राज्यात कृषि व संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, कृषि उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती/संस्था/गट यांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभुषण पुरस्कार, जिजामाता कृषिभुषण पुरस्कार, सेंद्रिय शेती कृषिभुषण पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व कृषि विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सम्मानीत करण्यात येते. महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत सन २०२३ या वर्षामध्ये कृषि व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती/गट/संस्था यांचे वरीलप्रमाणे विविध कृषि पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

तरी जास्तीत जास्त शेतकरी/गट/संस्था/व्यक्ती यांनी विविध कृषि पुरस्कार प्रस्ताव आपल्या नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करावे, असे आवाहन राज्याचे कृषि आयुक्त रविंद्र बिनवडे यांनी केले आहे. विविध कृषि पुरस्कार प्रस्ताव तयार करणेकामी अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# दिव्यांगचा मदतीसाठी सदैव तत्पर-आ.विनोद अग्रवाल




**गोंदिया :** गोंदिया येथील पंचायत समिती मध्ये आ.विनोद अग्रवाल यांच्या हस्ते दिव्यांग मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. ८३ दिव्यांग मुलांना या शिबिरातुन साहित्य वाटप करण्यात आले असून त्यात २५ मुलांना शैक्षणिक साहित्य, २५ मुलांना व्हील चेयर, ४ मुलांना ट्रायसिकल, ४ मुलांना रोलेटर व २५ मुलांना कमोड चेयर वाटप करण्यात आले. समग्र शिक्षा अभियानातील जिला समन्वयक दिव्यांग विभाग विजय ठोकने यांच्या मार्फत साहित्य वाटप करण्यात आले असून आ.विनोद अग्रवाल यांनी अपंग विभागाचे जिल्हा समन्वयक विजय ठोकणे यांचे कौतुक करून त्यांच्याबद्दल ते म्हणाले मोठ्या आजाराने त्रस्त असतानाही ते अपंगांची सेवा करत आहेत, ही अतिशय अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

ते जवळपास १५ वर्षांपासून गोंदिया जिल्ह्यातील दिव्यांग मुलांची सेवा करत असून त्यांची सेवा वाखाणण्याजोगी आहे. यावेळी सर्वांना संबोधित करताना आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, मी सभापती असताना गोंदियात महाराष्ट्रातील पहिले अपंग चिकित्सा केंद्र सुरू केले.अशी माहिती आ.विनोद अग्रवाल यांनी उपस्थित असलेल्या सर्व जणाना संबोधित केले.

कार्यक्रमामध्ये पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले म्हणाले की, जनतेचे आमदाराने "सबका साथ सबका विकास" या संकल्पनेतून दिव्यांगांसाठी खूप चांगले काम केले आहे सध्या दिव्यांग मुलांना शैक्षणिक साहित्य आणि व्हील चेअर, रोलेटर, ट्रायसायकल, कमोड चेअर या साहित्याचे वाटप करण्यात येत आहे. ते सर्वसामान्यांच्या भल्यासाठी कार्य करतात आणि काम करण्यावर विश्वास ठेवतात, असे पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले यांनी सांगितले.

यावेळी आ.विनोद अग्रवाल सभापती मुनेश रहांगडाले, विजय ठोकने जिला समन्वयक, गट विकास अधिकारी आनंद पिंगले, गट शिक्षणाधिकारी समरीत दीपाताई चंद्रिकापुरे जिप सदस्य, शैलजाताई सोनवाने प.स. सदस्य, मंजूताई डोंगरे प.स.सदस्य, कनीराम तावाड़े प.स.सदस्य, बाबा चौधरी संचालक कृषि उत्पन्न बाजार समिति, गोंदिया, रामदयाल रहांगडाले, चित्रसेन डोंगरे, व अन्य पंचायत समिती येथील पदाधिकारी व कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

# प्रोत्साहन राशी अनुदान मिळण्याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीसानी दिले सहकार विभागाला निर्देश

**अर्जुनी मोर.-** महात्मा ज्योतिबा फुले प्रोत्साहन राशी (५० हजार रुपये पर्यंत कर्जमाफी) योजनेचा लाभ गोंदिया जिल्ह्यातील वंचित शेतकऱ्यांना त्वरित मिळण्यासाठी माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फ्फडणवीस यांचे कडे सतत पत्र व्यवहार व प्रत्येक्ष भेटुन व सवीस्तर चर्चा करुन ही मागणी रेटून धरल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकार विभागाला अनुदानाविषयी निर्देश दिले आहेत.



उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नियमित कर्ज परतफ्फेड करणा?्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर लाभ देण्यासाठी सन २०१७ -१८ सन २०१८-१९ आणि सन २०१९- २० या कालावधीत महात्मा ज्योतिबा फुले प्रोत्साहन राशी कर्जमाफी योजना सुरू करण्यात आली होती. सदर योजनेचा बऱ्याच शेतकऱ्यांना अजून पर्यंत लाभ मिळाला नाही. त्यामध्ये आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील बाराभाटी, ईडदा, नवेगाव बांध, पांढरवाणी येथील एक हजाराचे जवळपास शेतकऱ्यांना अजून पर्यंत प्रोत्साहन राशीचा लाभ मिळालेला नाही नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या उर्वरित शेतकऱ्यांना महात्मा फुले प्रोत्साहन राशी योजनेचा लाभ मिळावा म्हणून माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी संबंधित विभागांकडे सतत पाठपुरवठा केला.

याबाबत बडोले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देत भेटून सविस्तर चर्चा केली. यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लगेच दखल घेऊन पत्र क्रमांक ७१३२९६२, दिनांक ८ जुलै अन्वये सहकार विभागाला निर्देश देऊन हा प्रश्न त्वरित मार्गी लावून प्रोत्साहन राशी त्वरित देण्याचे निर्देश दिले आहे. माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे पाठपुराव्यामुळे आता प्रोत्साहन राशी शेतकऱ्यांना मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत

# अर्जुनी मोरगावच्या ३४ घरांवर रेन वॉटर हार्वेस्टिंगला सुरुवात

## स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा अभियान, नागरिकांनी दिला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अर्जुनी मोरगाव:** स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा अभियानांतर्गत पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याकरिता रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम आपल्या जुन्या तशाच नव्या घरामध्ये बनविण्याकरिता स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा नगरपंचायत अर्जुनी मोरचे ब्रँड अॅबेसेडर अश्विनसिंह गौतम यांनी आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नगरातील तब्बल ३४ जुन्या तसेच नवीन घरांमध्ये नगरवासीयांकडून स्वखर्चाने रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम तयार करण्यात येत आहे. त्यांच्या या कार्याला नगरपंचायत स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा अभियानातर्फे आवश्यक ती मदत करण्यात येईल.

पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे आज काळाची गरज आहे. भूजल साठा वाढविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टर सिस्टीम बनविण्याची अत्यंत आणि नितांत आवश्यकता आहे. नगरातील प्रत्येक जुन्या तसेच नवीन घरांमध्ये या परियोजनेची स्थापना करण्याची गरज आहे. पावसाचे पाणी जोपर्यंत जमिनीत मुरणार नाही. तोपर्यंत भूजल साठा वाढणार नाही. विहिरी आणि बोरवेल मध्ये पाणी येणार नाही. भविष्यात येणारा संकट खूप मोठा आहे.आज आपल्याला इतक्या सोप्या पद्धतीने पाणी मिळते. भविष्यात आपल्या मुलाबाळांना इतक्या सोप्य पद्धतीने पाणी मिळेल याची शाश्वती देता येत नाही. त्याचीच तयारी म्हणून आजच आम्हाला या येणाऱ्या संकटाला तोंड देण्याची तयारी आजच करुन ठेवण्याची आहे. त्याकरिता भूजल साठा वाढविणे खूप गरजेचे आहे. भूजल साठा रेन वॉटर हार्वेस्टिंग माध्यमाने खूप सोप्या पद्धतीने वाढवू शकतो.



विहिरी आणि बोरवेल्सवर लावलेले रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम खूप मोठ्या प्रमाणात जलसाठा वाढविण्यात मदत करतो. या सर्व कामांना नगरपंचायत नेही पुढाकार घून सहकार्य करण्याचे आवाहन ब्रँड एम्बेसेडर अश्विनसिंह गौतम यांच्यामार्फत करण्यात आले आहे. नगरातील जागृत लोकांकडून घेण्यात आलेल्या या निर्णयाकरिता नगरपंचायत मुख्याधिकारी राजू घोडके, स्वच्छता प्रमुख प्रशासकीय अधिकारी अमोल जाधव, स्वच्छता समन्वयक निमिश मुररकुटे यांनी सर्वांचे कौतुक केले.

# खांब,मीटर नसतानाही बिल १६ हजार

## कालीमातीच्या सहाय्यक अभियंत्याचा कारनामा : कातुर्लीचा शेतकरी आला संकटात


**गोंदिया:** झिरो पोल योजनेंतर्गत कनेक्शन देण्यासाठी महावितरणच्या कालीमाती येथील सहाय्यक अभियंत्याने १५ हजार रुपये जानेवारी २०२३ मध्ये घेतले. त्यानंतर प्रतीज्ञापत्र, ऑनलाइन करण्यास सांगितले. महावितरण, महसूलची नाहरकत हे सर्वच करण्यास सांगितले. मात्र अद्यापही ना खांब लागले, ना मीटर असे असतानाही त्या शेतकऱ्याला १६ हजार ३९० रुपयांचे बिल देण्यात आले. आता तो सहाय्यक अभियंता ती योजना बंद झाल्याचे सांगून आपले हात झटकत आहे. परिणामी तो शेतकरी संकटात आला आहे.

आमगाव तालुक्यातील कातुर्ली येथील प्रेमलाल अनंतराम बिसेन यांची शेती कातुर्ली या गावात आहे. त्यांना महावितरणच्या एका कर्मचाऱ्याने २०२३ मध्ये महाराष्ट्र कृषी धोरण अंतर्गत झिरो पोल योजनेतर्गत शेतात ट्रांसफार्मर लावून मिळते. त्यासाठी महावितरणच्या कार्यालयात संपर्क करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार प्रेमलाल बिसेन यांनी कालीमाती येथील महावितरणच्या उपकेंद्रात जावून सहाय्यक अभियंता अनंत प्रसाद कर यांची यांची भेट घेतली. अनंत कर यांनी त्यांना यासाठी १५ हजार रुपये लागतील असे सांगितले.

शेतकरी बिसेन यांनी १५ हजार रुपये सहाय्यक अभियंत्याला जानेवारी २०२३ मध्ये दिले. त्यानंतर झिरो डीपी अंतर्गत कनेक्शन मिळेल अशी हमी दिली. त्यासाठी प्रतीज्ञापत्र करून महावितरण आणि महसूल विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले. शेतकऱ्याने तसेच केले. सर्व प्रक्रीया महावितरणच्या पोर्टलवर ऑनलाइन केली. परंतु, ट्रांसफार्मर, खांब आणि मीटर देखील लागले नाही. परिणामी प्रेमलाल बिसेन यांनी पुन्हा कालीमाती कार्यालयात अनंत प्रसाद कर यांची भेट घेतली. आता मात्र सहाय्यक अभियंत्याने ती योजना बंद झाली असे सांगितले. असे असताना मात्र त्या शेतकऱ्याला महावितरणने १६ हजार ३९० रुपयांचे बिल धाडले. कसलीही वीज खर्च न करता आणि खांब तसेच मीटर देखील नसताना हातात पडलेले विजेचे बिल बघून त्या शेतकऱ्याच्या पायाखालची वाळू सरकली. सहाय्यक अभियंत्याला दिलेले १५ हजारही गेले, वर्षभरात मारलेले हेलपाटे देखील वाया गेले असताना न वापरलेल्या विजेचे देखील बिल आले. महावितरण शेतकऱ्यांच्या जीवावर उठले की काय? असा सवाल यावरून उपस्थित होत आहे.

### उंटावरूनच हाकल्या शेळ्या

**कोणत्याही शेतात किंवा घरी विद्युत मीटर बसवायचे असल्यास डिमांड भरण्यापूर्वी आणि त्यानंतर स्थानिक लाईनमनने सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे. त्यानंतरच सर्व प्रक्रीया केली जाते. मात्र या प्रकरणात लाईनमन आणि सहाय्यक अभियंत्याने कसलीही सहानिशा न करता डिमांड काढली. आता मीटर कार्यालयात पडून असतानाही शेतकऱ्याला १६ हजारांचे बिल देण्यात आले. हा प्रकार शुद्ध फसवणुकीचाच आहे.**



### आत्महत्या हाच पर्याय

**शेताला सिंचन व्हावे म्हणून शासनाची योजना असल्याने महावितरणच्या कार्यालयाने जे सांगितले ते केले. त्यांना पैसे दिले. सर्व कागदपत्रांची जमवाजमव केली. मात्र वर्ष लोटून मीटर लागले नाही. खांब लागले नसताना पुन्हा १६ हजारांचे बिल देण्यात आले. वारंवार कार्यालयाच्या चकरा मारून गोलगोल फिरविण्यात येत आहे. आता आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्याला महावितरण जबाबदार राहिल.**

**प्रेमलाल बिसेन, शेतकरी कातुर्ली**

### बिल माफ करून देवू

**आधी त्यांचा डिमांड काढताना आमची गफलत झाली. कर्मचाऱ्यांनी योग्य माहिती न दिल्याने मीटर देण्यात देण्यात आला. यात आमच्या कार्यालयाची चूक आहे. आता नवीन धोरणांतर्गत त्यांना जोडणी देण्यात येणार आहे. परंतु, डिमांड काढणे बंद आहे. डिमांड सुरू झाल्यावर दुसरी जोडणी देण्यात येईल. त्यांना आलेले बिल माफ करण्यात येईल.**

**अनंत प्रसाद कर, सहाय्यक अभियंता कालीमाती**

# जिल्ह्यात तिसऱ्या रेल्वे लाईनचे ३८ कि.मी.काम शिल्लक, लवकरच वेगाने धावणार गाड्या; १८० कि.मी. चे काम पूर्ण

**गोंदिया :** रेल्वे मार्गाच्या तिप्पटीकरणामुळे गाड्यांना वेग मिळेल, प्रवासी गाड्यांचा वक्तशीरपणा वाढेल आणि रोजगार निर्मिती होईल. या उद्देशाने राजनांदगाव–नागपूर रेल्वे मार्गावरील तिसरी लाईन टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे, यातील १८० कि.मी.चे काम लवकरच पूर्ण होणार आहे. याचा मुंबई–हावडा रेल्वे मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होईल कारण गाड्यांचा वेग वाढेल आणि प्रवाशांच्या वेळेची बचत होईल.



दक्षिण पूर्व मध्य रेल्वे विभागांतर्गत, दुर्ग ते कळमना विभागात अंदाजे ३४२५ कोटी रुपये खर्चाच्या तिसऱ्या मार्गिकेचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. राजनांदगाव–नागपूर एकूण २२८ कि.मी. पैकी आतापर्यंत एकूण १८० किलोमीटरचे काम पूर्ण केले गेले आहे. गोंदिया जिल्ह्यातील दरेकसा–सालेकसा या तिसरी लाईन वगळता (१०.०० किमी) उर्वरित सालेकसा–धानोली (७ कि.मी.), गुदमा–गंगाझरी (२४ कि.मी.) आणि कामठी–कळमणा (७ कि.मी.) या एकूण ३८ किमीच्या कामास वन व वन्यजीव विभागाची (वन्यजीव) मंजुरी मिळाली असून हे काम या आर्थिक वर्ष २०२४ –२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तर दरेकसा–सालेकसा (१९ किमी.) तिसरी लाईन प्रकल्प २०२५–२६ पर्यंत पूर्ण होईल.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातील पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासाच्या कामांतर्गत दुर्ग–कळमणा तिसरा रेल्वे मार्ग तयार झाल्यानंतर अधिकाधिक रेल्वे गाड्या चालवणे शक्य होणार असून प्रवासी रेल्वे सेवेत वाढ होण्याबरोबरच रेल्वे प्रवाशांना सुरळीत व सुरक्षित रेल्वे सेवा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. तसेच वाहनांचा वेग वाढेल आणि वेळही वाचेल. या प्रकल्पाची अंदाजे किंमत ३४२५ कोटी रुपये आहे.

यावेळी, ही सर्व कामे सुरक्षितता आणि रेल्वेच्या काम काजात कमीत कमी व्यत्यय आणून वेगाने पूर्ण केली जात आहेत. तर कळमना– नेताजी सुभाषचंद्र बोस (इतवारी) ३ कि.मी. या आर्थिक वर्षात रेल्वे मार्गाचे दुहेरीकरणही पूर्ण करण्यात येणार असून, सध्या दुर्ग–कळमणा हा विभाग पूर्णपणे स्वयंचलित सिग्नल यंत्रणेने सुसज्ज झालेला आहे. देशाच्या प्रगतीबरोबरच दुर्ग–राजनांदगाव–कळमणा तिसरा रेल्वे मार्ग प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या कामांमुळे गाड्यांची संख्या वाढणार आहे. यामुळे संबंधित क्षेत्रांचा विकास, आर्थिक आणि औद्योगिक विकास आणि नवीन रोजगार निर्मितीला चालना मिळेल अशी शक्यता आहे.

# अर्जुनी मोरगाव मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला तिथे भाजपचाच दावा-माजी मंत्री बडोले



**गोंदिया:–** लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी पक्षाचे नेते त्यांच्या संभाव्य उमदवारांचे अगोदरच संकेत देतात. अनपेक्षितपणे मला सांगण्यात आले की तुम्हाला भाजपकडून निवडणूक लढवावी लागेल. अर्जुनी मोरगावची जागा ही महायुतीमध्ये भाजपच्या अस्तित्वाची लढाई आहे. अर्जुनी मोरगाव हा भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला असल्याने आपला आमदार निवडून आला तरच आपले अस्तित्व टिकेल, हे भाजपच्या मोठ्या नेत्यांनाही ठाऊक आहे. त्यामुळे तिथून पक्ष आपला दावा सोडणार नाही, असे माजी सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री राजकुमार बडोले यांनी पत्रकारांशी औपचारिक चर्चा करताना सांगितले.

ते पुढे म्हणाले, मला २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक लढवायची आहे. युती होणार की नाही हा नंतरचा विषय आहे. २०१४ च्या युती सरकारच्या काळात राज्याचा सामाजिक न्याय मंत्री असताना केलेल्या कामांमुळेच आजही लोक मला ओळखतात. या कार्यकाळात मुंबईत इंदू मिलमध्ये काम झालं, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमध्ये घर विकत घेतले, दरवर्षी २०० विद्यार्थी आयएएससाठी पाठवायचे या सर्व गोष्टी आपल्या समाजाच्या मनात रुजल्या आहेत. अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात अनुसूचित जाती व नव्या मतदारांची सहानुभूतीही भाजपकडे आहे. असे असले तारी अशा अनेक क्षेत्रांत स्वतःला मजबूत समजणारे नेते आहेत आणि ते निवडणूक लढवणार आहेत, त्यामुळे यंदाची लढत तिरंगी होण्याची शक्यता आहे. त्यातही मार्ग सोपा होईल.

या मतदार क्षेत्रात भाजपची ४१ टक्के व्होट बँक आहे ती कोणीही तोडू शकत नाही आणि जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपला त्याहूनही जास्त मते मिळाली आहेत. आज ग्रामीण भागातील मतदारांमध्ये जागरुकता आहे. हे त्यांच्या वागण्या बोलण्यातून व्यक्त होते. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने राज्यघटना, संविधान बदलाचे खोटे आख्यान ठरवले होते.

काँग्रेस पक्षाच्या वतीने ८५०० रुपये खटाखट देणारी पत्रिका वाटण्यात आल्या. आम्हाला अजूनही लोक (मतदार) विचारतात पैसे कधी मिळतील? अश्या प्रकारे काँग्रेस ने आपल्याच मतदारांची दिशाभूल केली आहे. परंतु पुन्हा पुन्हा लोकांना भूलथापा देऊ शकत नाहीत याची जाणीव ग्रामीण भागातील लोकांनाही झाली असल्याचेही बडोले यांनी सांगितले.

# लाडली बहिन योजनेचा लाभ सर्वापर्यंत पोचवा-जि.प.अध्यक्ष रहांगडाले



**गोंदिया:–** राज्य शासनाच्या वतीने महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी ममुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण योजना म राबविण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करून एकही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले. तालुक्यातील ५ जिल्हा परिषद क्षेत्रातील १० पंचायत समिती गणातील प्रत्येक जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांनी किमान १० शाळा व अंगणवाडीना भेटी देवून मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करावे व किमान १० शाळा व अंगणवाडी मॉडेल करावे, असे आवाहनही त्यांनी उपस्थित जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांना केले.

जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती कार्यालयात जि.प.अध्यक्ष रहांगडाले यांनी आयोजित विकास कामांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजी.यशवंत गणवीर, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, पंचायत समिती सभापती संगीता खोब्रागडे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. भुमेस्वर पटले, जिल्हा परिषद सदस्य कविता ताई रंगारी, निशा तोडसाम, ललिता डोंगरवार, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे, पंचायत समिती उपसभापती शालिंदर कापगते, पंचायत समिती सदस्य चेतन वडगाये, डॉ. वाढई, आदी उपस्थित होते.यावेळी पंचायत समिती स्तरावरील सर्वच विभागाचा आढावा घेण्यात आला.

गोंदिया पंचायत समितीत आयोजित आढावा बैठकीला समाजकल्याण सभापती पुजा अखिलेश सेठ, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी(महिला व बालकल्याण) संजय गणवीर, जिल्हा कृषी विकास अधिकारी महेंद्र मडामे, पंचायत समिती गट विकास अधिकारी आनंद पिंगळे, सर्व जि.प.सदस्य, पं.स.सदस्या शैलजाताई सोनवाने, सौ.जितेश्वरी रहांगडाले, सौ.मीनाक्षी बारलिंगे, पं.स.सदस्य अजाबराव रिनायत उपस्थित होते.

शासनाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. मात्र त्यांचा लाभ सामान्य नागरिकांना मिळत नसल्याने ते लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे आता सर्वांना लाभ कसा दिला जाईल याचे नियोजन करून शासनाच्या योजना सामान्यांपर्यंत पोहचविण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. माझी लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीसाठी कुणीही पैशाची मागणी केली किंवा अडवणूक केली तर त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी जनार्दन खोटरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण संजय गणवीर, कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग सत्यजित राऊत, सहायक गटविकास अधिकारी खोटेले यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी सानप यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी (आरोग्य) शेंडे यांनी तर आभाप्रदर्शन अधीक्षक जयंत खोटेले यांनी केले.

# धानाची उचल न झाल्याने लाखो क्विंटल धान खराब होण्याच्या स्थितीत-माजी खासदार बोपचे

**गोंदिया:–** महागाईने उच्चांक गाठला आहे. सर्वच वस्तूंचे दर दुपटीने तिपटीने वाढले आहेत. विजेचे दरही भरमसाठ वाढले आहेत अशात शासकीय धान भरडाई करणाऱ्या मिलर्सना कित्येक वर्षापासून आजही केंद्र सरकार १० रुपये प्रति क्विंटल भरडाई दर देत असून हे हास्यास्पद असल्याचे मत अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार खुशाल बोपचे यांनी येथील शासकीय विश्राम भवनात ५ जुलै रोजी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले.





पूर्व विदर्भातील भंडारा, गोदिया, गडचिरोली चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यातील काही भागात मोठ्या प्रमाणात खरीप व उन्हाळी हंगामात धानाचे उत्पादन घेतले जाते. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य दर मिळावा त्यासाठी शासनाची हमीभाव योजना आहे. परंतु आज शेतकरी, मिलर्स आणि संस्था शासनाच्या धोरणामुळे त्रस्त आहेत. अद्यापही खरीप व उन्हाळी हंगामातील धानाची उचल झालेली नाही. गोदामात पडून असलेल्या लाखो क्विंटल धान खराब होण्याच्या मार्गावर आहे. मिलर्सच्या मागण्यांवर सोमवारी झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी तोडगा काढण्यास अपयशी ठरले. आता मिलर्सच्या मागण्यांवर मुंबईत बैठक होणार आहे.

शासनाच्या नियोजनशून्यतेचा फटका शेतकऱ्यांना बसला. त्यांना कमी किमतीत व्यापाऱ्यांना धान विकावे लागले. महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी समस्यांचे निराकरणासाठी शासनाकडे शिफारस करणे अपेक्षित होते परंतु तसे होऊ झाले नाही. वेळेत धानाची उचल होत नसल्याने वजनात मोठी घट येते. शासन क्विंटलवर एक किलो घट मंजूर करते. सात आठ महिने गोदामात धान पडून राहत असल्याने प्रतिक्विंटल चार ते पाच टक्के घट येते. ही घट संस्थांच्या माथी मारली जाते. परिणामी त्यांचे नुकसान होते. शासनाने धानाच्या हमीभावात अल्प वाढ करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसली. धानाला चार हजार रुपये प्रतिक्विंटल हमीभाव द्यावा, धान भरडाईचे दर वाढवावे, धनाची उचल करून येथे हंगामातील धान खरेदी वेळेस सुरू करावी, अशी मागणी खुशाल बोपचे यांनी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास महासंघाच्या वतीने तीव्र जन आंदोलन छेडण्याच्या इशाराही त्यांनी पत्र परिषदेत दिला.

# मंडल यात्रेच्या समारोपाला गोंदियात येणार प्रसिध्द विचारवंत प्रा.लक्ष्मण यादव

## यात्रेच्या नियोजन संदर्भात विश्रामगृहात पार पडली बैठक



**गोंदिया:–** दरवर्षीप्रमाणे नागपूर येथून निघत असलेल्या मंडल यात्रेचा समारोपाचा मान यावेळी गोंदिया जिल्ह्याला मिळाला आहे. त्या निमित्ताने येत्या ७ ऑगस्ट २०२४ रोजी मंडल यात्रा समारोप कार्यक्रमाला मुख्य वक्ते म्हणून ओबीसी बहुजन विचारवंत प्रा.लक्ष्मण यादव हे गोंदियाला येत आहेत.त्या कार्यक्रमाच्या आयोजन निमित्ताने शनिवारला येथील विश्रामगृहात ओबीसी संघटना पदाधिकारी यांची बैठक पार पडली. बैठकिच्या अध्यक्षस्थानी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे होते.

या बैठकित मंडल यात्रेच्या गोंदिया जिल्ह्यातील मार्ग आणि कार्यक्रमाची रुपरेषा यावर चर्चा करुन प्रा.यादव यांचे विचार ऐकण्याकरीता ओबीसी एसस्सी एसटी समाजबांधवासंह ओबीसी विद्यार्थ्यांना कार्यक्रमात कशापध्दतीने आणता येईल यावर चर्चा करण्यात आली. तसेच ओबीसी विद्यार्थी विद्यार्थीनीकरीता वसतिगृह प्रवेशाकरीता अर्ज प्रकिया सुरु झाल्याने ही माहिती सर्वापर्यंत पोचविण्यावर चर्चा करण्यात येऊन मंडल यात्रेचा समारोप यशस्वी करण्याचे ठरविण्यात आले. कार्यक्रमाच्या खर्चाचेही नियोजन करण्यावर चर्चा करण्यात आली.

बैठकीला ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, कैलाश भेलावे, उमेंद्र कटरे, जि.प.सभापती संजय टेंभरे, ओबीसी संघर्ष समितीचे राजीव ठकरेले, सुनिल पटले, गौरव बिसेन, राजेश नागरीकर, ओबीसी सेवा संघाचे भुमेश्वर ठाकरे, सी.पी.बिसेन, प्रमोद–कुमार बघेले, भारतीय पिछडा शोषित संघटनेचे प्रेम साठवणे, संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे, वशिष्ट खोब्रागडे बाबा बिसेन निशिकांत बंसोड़,प्रतीक पारधी, प्रमोद कोसरकर, बालू कोसरकर, श्री.कापगते यांच्यासह सर्व ओबीसी बहुजन संघटनाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# स्टॉप डायरिया अभियान संपूर्ण जिल्ह्यात सुरु

## विविध उपक्रमाद्वारे ग्रामीण भागात ३१ ऑगस्ट पर्यत अभियान राबवणार

**गोंदिया :** जलजन्य आजार हे पावसाळ्यात डोके वर काढतात. पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे जलजन्य आजार मोठ्या प्रमाणात पसरतात म्हणून ह्या काळात नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करणे हे आवश्यक आहे. ग्रांमपंचायत यांनी पाणी निर्जंतुक करून शुद्ध पाणी पुरवठा केल्यास जलजन्य आजार होणार नाहीत. जलजन्य आजार रोखण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १ जुलै ते ३१ ऑगस्ट या दरम्यान स्टॉप डायरिया अभियान राबविण्यात येत आहे. दि.३ जुन रोजी जिल्हाधिकारी प्रजित नायर व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम यांचे हस्ते द्विपप्रज्वलन करुन करण्यात आले.





ह्याप्रसंगी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आंनदराव पिंगळे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुमित बेलपांडे, महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रोषन राऊत, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, आरोग्य विभागाचे जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी विजय आखाडे उपस्थित होते.

पावसाळ्यात पाणी साठे दूषित होतात आणि हेच दूषित पाणी आणि पिऊन डायरिया, गॅस्ट्रो, कावीळ यासारखे आजार होतात त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुक करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना प्रतिबंध घालता येतो.

ह्या अभियानामध्ये जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महिला बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, ग्रामपंचायत विभाग आर्दीच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. हे अभियान एकूण आठ आठवडे चालणार असून प्रत्येक आठवड्यात वेगवेगळे उपक्रम गावपातळीवर घेण्यात येणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते "स्टॉप डायरिया" अभियानाचे विविध जनजागृती साहित्याचे अनावरण करण्यात आले.

या अभियानामध्ये गावातील पाणी पुरवठा स्त्रोत, अंगणवाड्या, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, सरकारी कार्यालये, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत येथील पाण्याची गुणवत्ता टिकवून ठेवणे व नागरिकांना, विद्यार्थी याना शुद्ध पाणी पिण्यास उपलब्ध करणे हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेऊन गावस्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी व अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा व तालुका पातळीवर सर्व अधिकारी, कर्मचारी, अशा कार्यकर्ती, पाणी पुरवठा कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

या अभियानामध्ये पिणाऱ्यांच्या पाण्याचे व्यवस्थापन, स्वच्छता जनजागृती कार्यक्रम, पाणी गळतीच्या जागा शोधून त्याची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याचे साठे तपासणे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता, घरगुती स्तरावरील पाणी टाक्यांची स्वच्छता, नादरुस्थ असलेले शौचालय दुरुस्थ करणे, ग्रामस्थांना पिण्याच्या शुद्ध पाण्याबाबत आरोग्य शिक्षण देणे, कचऱ्याच्या वर्गीकरण व योग्य विल्हेवाट लावणेबाबत जागृती करण्यात येणार आहे.

उपकेंद्र स्तरावर माता व किशोरवयीन मुली यांची बैठक घेऊन वैयक्तिक स्वछता, पावसाळ्यात होणारे आजार व त्याबाबत घ्यावयाची खबरदारी बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

शाळेमध्ये आरोग्य कर्मचारी यांच्या मार्फत विद्यार्थी याना जलजन्य आजाराबाबत मार्गदर्शन करणे, चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करणे, शाळेमध्ये विशेष स्वछता मोहीम राबविण्यात येणार आहे. अभियान यशस्वी करण्याचे आव्हान जलजन्य आजाराबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करून गावपातळीवर अभियान यशस्वीपणे राबविण्यात यावे असे आव्हान मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी केले आहे.

### २० जुलै पर्यंत जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**गोंदिया :** पोलीस अधीक्षक गोंदिया कार्यालयाचे ३ जुलै २०२४ चे पत्रानुसार ६ ते २० जुलै २०२४ या कालावधीत जिल्ह्यात विविध पक्ष व संघटनांकडून त्यांच्या प्रलंबीत मागण्या संदर्भाने उपोषणे, धरणे, मोर्चे, रास्तो रोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केली जात आहेत. तसेच १७ जुलै रोजी आषाढी एकादशी व मोहरम उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियम क्रमांक २२ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक ६ जुलै पासून ते २० जुलै २०२४ पर्यंत अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी जिल्ह्यात मनाई आदेश लागू केले आहे.

# गोरेगाव तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार भवनासाठी भूखंडाची मागणी

**गोरेगाव :** शासन मान्यताप्राप्त व नोंदणीकृत गोरेगाव तालुका पत्रकार संघ नोंदणी क्रमांक ७७७ गोरेगाव येथील गट क्रमांक ५६१, १.५० हेक्टर जमीन शासकीय भावाने देण्याची मागणी करणारे निवेदन गोरेगाव तहसीलदारांना दिले आहे. आर. प्लॉट क्रमांक ४१, क्षेत्रफळ १५०० चौरस फूट किमत देण्यास सरकार तयार आहे.

पत्रकार संघ गेल्या दहा वर्षांपासून ही मागणी करत आहे, मात्र प्रशासनाने त्याकडे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे तातडीने भूखंड वाटप करण्याची मागणी केली आहे.

यावेळी गोरेगाव तालुका पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रणजित सरोजकर यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनाच्या वेळी सचिव डिलेश्वर पंधराम, कोषाध्यक्ष प्रमोद नागनाथे, हौसलाल रहांगडाले, खेमेंद्र कटरे, मनोज सरोजकर व भूमेश्वर धमगाये आदी उपस्थित होते.